

नवी दिल्ली : रक्षाबंधनाचा सण देशभरात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शाळकरी मुलींकडून राखी बांधून हा सण साजरा केला. या वेळी त्यांनी मुलींशी संवादही साधला.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३४
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'त्यांना' १५०० रुपयांची किंमत कशी कळणार? -चित्रा वाघ/२
बहिणींच्या रक्षणासाठी सदैव तत्पर -आमदार महेश बालदी/३
प्रो गोविंदा लीगमध्ये सातारा सिंघम्सला विजेतेपदाचा मान/८

# ...तर मी राजकारणातून संन्यास घेईन

## मराठा आरक्षणावरून देवेंद्र फडणवीसांचे विरोधकांना आव्हान



**मुंबई : प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे याची मला कल्पना आहे. जर एकनाथ शिंदे यांनी सांगितले, मराठा आरक्षणाकरिता त्यांना निर्णय घ्यायचाय, पण त्यांच्या निर्णयामध्ये मी अडथळा आणला असेल, तर मी त्याच क्षणी राजीनामा देईन आणि मी राजकारणाचा संन्यास घेईन, असे आव्हान मराठा आरक्षणावरील आरोपांवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सगळे काही द्यायचे आहे. मग ते सगेसोयरे असेल, मराठा आरक्षण असेल मात्र देवेंद्र फडणवीस हे त्यांना करू देत नाही, असा आरोप मनोज जरांगे पाटलांनी केला. त्यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याचे सगळे अधिकार हे मुख्यमंत्र्यांकडे असतात. इतर सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या अधिकारावर काम करत असतात. एकनाथ शिंदे आणि मी एकत्रित काम करतो. शिंदेंना पूर्ण पाठबळ आणि पाठिंबा माझा आहे. त्यामुळे जरांगेंनी केलेल्या आरोपावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावे. मी मराठा आरक्षणाच्या मध्ये येतोय असे मुख्यमंत्री म्हणाले तर मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून निवृत्त होईन, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

### आरोपाला प्रत्युत्तर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आरक्षण देतील, पण त्यांना फडणवीस आरक्षण देऊ देत नसल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य केले होते. देवेंद्र फडणवीस हे जाणूनबुजून आरक्षण मिळू देत नाहीत. त्याचे फळ त्यांना भोगावी लागतील असे विधान मनोज जरांगे पाटील यांनी केले होते. या आरोपला देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना सडेतोड प्रत्युत्तर दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी कुठलाही प्रयत्न केला आणि मी तो थांबवला असे शिंदेंनी सांगितले तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून निवृत्त होईन. जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अतिशय अयोग्य आहे असे सांगत देवेंद्र फडणवीसांनी जरांगेंच्या आरोपावर प्रत्युत्तर दिले.

आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले, ते एकतर मी (देवेंद्र फडणवीस) घेतले किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले आहेत. तसेच मी मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिलेलो आहे. त्यामुळे अशा प्रकारे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न हा अयोग्य आहे. आता मी पुन्हा एकदा सांगतो की जर मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, त्यांना मराठा आरक्षणाबाबतचा निर्णय घ्यायचा आहे, पण त्यामध्ये मी अडथळा आणला, मी निर्णय होऊ दिला नाही, तर त्याच क्षणी राजीनामा देईल आणि राजकारणामधूनही सन्यास घेईल, असं देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांच्या आरोपाला प्रत्युत्तर देताना म्हटले आहे.

---

## जरांगेंच्या आरोपात तथ्य नाही; फडणवीसही मराठा समाजाच्या पाठीशी -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील सातत्याने देवेंद्र फडणवीसांना टार्गेट करतात. त्यात फडणवीसांमुळे मुख्यमंत्री शिंदेंना आरक्षण देता येत नाही असे विधान त्यांनी केले. त्यावरून देवेंद्र फडणवीसांनी यावर एकनाथ शिंदेंनी उत्तर द्यावे, असे म्हटले होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत खुलासा करत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपात तथ्य नसल्याचे म्हटले आहे.

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मी, देवेंद्र फडणवीस, अजित पवार एकत्र बसलो. आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावलें. प्रत्येक बैठकीला देवेंद्र फडणवीस होते. मराठा



आरक्षणासाठी जो कायदा केला त्यात फडणवीसांची मोलाची भूमिका होती. अजित पवारही सहभागी होते. मनोज जरांगेंच्या मागणीनुसार मराठवाड्यात ज्यांच्या कुणबी नोंदी ते आम्ही देऊ लागलो. मराठा समाजाला ज्या सवलती होत्या त्या दिल्या. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले त्याला विरोध करायला कोर्टात कोण गेले ते आधी बघा असे त्यांनी सांगितले.

मराठा आरक्षण मिळू नये यासाठी विरोधी पक्षाचा हात आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या कारकिर्दीत मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम झालेले. तेव्हा मीही कमिटीत होतो. देवेंद्र फडणवीस मराठा आरक्षणाला विरोध करतायेत हे पूर्णपणे चुकीचे आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपात तथ्य नाही. आम्ही जो काही निर्णय घेतो तो सर्वानुमते घेतो असे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पाठराखण केली.

(छाया: सुधीर नाझरे)



## रायगडात नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन सण उत्साहात साजरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

बहीण-भावाच्या अतूट नात्याची साक्ष देणारा रक्षाबंधन सण आणि नारळी पौर्णिमा हे दोनही सण रायगड जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरे झाले. या सणांचे औचित्य साधून ठिकठिकाणी नारळ फोडीच्या स्पर्धा झाल्या.

नारळी पौर्णिमेच्या सणाला कोळी समाजात अनन्य साधारण महत्व आहे. सागराला नारळ अर्पण करूनच काळी बांधव आपल्या होड्या समुद्रात लोटतात. अलिबाग, मुरूड, नागाव, रेवदंडा, नवगाव, श्रीवर्धन, उरण आदी समुद्रकिनारी नारळी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर कोळी-आगरी बांधवांनी मोठी गर्दी केली होती. सोन्याच्या मुलामा दिलेला नारळ सागराला अर्पण करण्यासाठी वाजत-गाजत नाचत मिरवणूक काढण्यात आली. एकाच पेहरावात मिरवणुकीत सहभागी झालेले कोळी बांधव, भगिनी, विशिष्ट ठेक्यात नाचताना लक्ष वेधून घेत होते.

भावाच्या मनगटावर राखी बांधून बहिणी त्याच्याकडून आपल्या रक्षणाची हमी घेतात. त्यांच्या दीर्घ आयुष्याची प्रार्थना करतात. हा पवित्र बहीण-भावाच्या गोड, प्रेमळ नात्याची साक्ष देणारा सणदेखील जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा झाला. पावसाची उघडीप आणि शासकीय सुट्टी यामुळे सणातील गोडवा अधिकच वाढला होता.

नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने ठिकठिकाणी नारळ फोडीच्या स्पर्धाही घेण्याची परंपरा आहे. अलिबाग तालुक्यात रेवस, मांडवा, बोडणी, सासवणे, अलिबाग, चेंढरे, किहीम, रेवदंडा आदी ठिकाणी या नारळ फोडीच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या.

## जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी हल्ला

### सीआरपीएफच्या अधिकाऱ्याला वीरमरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवरील तणावाचे वातावरण अद्याप कायम आहे. मागील काही दिवसांपासून दहशतवादी आणि भारतीय लष्करात चकमक सुरू आहे. सोमवारी (दि. १९) जम्मू-काश्मीरमधील उधमपूर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) अधिकाऱ्याला वीरमरण आले. दुडू भागात सीआरपीएफचे जवान नियमित गस्तीवर असताना दहशतवाद्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारानंतर सुरक्षा दलातील जवानांनीही त्यांना चोख प्रत्युत्तर दिले. या वेळी दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये गोळीबार झाला, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिली.

## निवडक

### बुलढाण्यात कोसळधार; घरे, दुकानांत शिरले पाणी

**बुलढाणा :** दीर्घ विश्रांतीनंतर बुलढाणा तालुक्यातील काही गावात सोमवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. यामुळे दुकाने व घरात पाणी शिरले असून खरीप पिकांची नासाडी झाली. यंदाच्या खरीप हंगामात बुलढाणा तालुक्यातील आजवरचा पाऊस असमाधानकारक असाच ठरला आहे. सोमवारच्या पावसामुळे हजारो हेक्टरवरील सोयाबीन, कपाशी, मूग, उडीद, मका ही पिके धोक्यात आली आहे.

### पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** पाच पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक सीईटी कक्षाकडून जाहीर करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांची सीईटी १ सप्टेंबर रोजी होणार असून, यासाठी २३ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना नोंदणी करायची आहे. प्रवेशासाठी पात्रता निकष आणि सामायिक प्रवेश परीक्षेसंदर्भातील माहिती पुस्तिका http://www.mahacet.orgच्या सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ना. रामदास आठवलेंनी केले यशश्री शिंदेच्या कुटुंबियांचे सांत्वन

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणमधील यशश्री शिंदे या युवतीची निर्घृन हत्या झाल्याची घटना नुकतीच घडली होती. त्या दिवंगत यशश्री शिंदेंच्या घरी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सोमवारी (दि. १९) भेट देऊन शिंदे कुटुंबियांचे सांत्वन केले.



या वेळी मंत्री आठवले यांनी सामाजिक न्याय विभागातर्फे यशश्री शिंदेच्या कुटुंबीयांना आठ लाख २५ हजारांची सांत्वनपर मदत आणि रिपब्लिकन पक्षातर्फे एक लाखाची मदत देण्याचे आश्वासन दिले. तर यशश्रीच्या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी तसेच यशश्रीचे वडील कंत्राटी कामगार असून तिला दोन बहिणी आहेत. त्यातील मोठ्या बहिणीला समाज कल्याण विभागातर्फे तातडीने चांगली नोकरी मिळवून देण्याची सूचना रायगड जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांना दिली.

या वेळी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, प्रमोद महाडिक, राहुल डाळिंबकर, प्रभाकर कांबळे, संजय गायकवाड, डॉ. प्रकाश शेंडगे, प्रकाश कमलाकर जाधव, सुमित मोरे उपस्थित होते.

## मंत्री आठवले आणि खासदार बारणेंचा नागरी सत्कार





**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप (खारघर) महायुतीचे सर्व घटक पक्ष आणि रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. रामदास आठवले आणि मावळचे खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांचा नागरी सत्कार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. १९) खारघरमध्ये करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, रि.पा.ई. (आ) रायगड जि. अध्यक्ष नरेंद्र गायकवाड, शिवसेना पनवेल जिल्हाध्यक्ष रामदास शेवाळे, राष्ट्रवादीचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे, रिपाई पनवेल जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांची विशेष उपस्थिती लाभली. यासोबतच भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, किर्ती नवघरे, खारघर सरचिटणीस नरेश ठाकूर, अमर उपाध्याय, आरती नवघरे, समीर कदम, किरण पाटील, अक्षय लोखंडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे निमंत्रक भाजप महिला मोर्चा खारघर अध्यक्ष साधना पवार, शिवसेना महिला आघाडी प्रमुख चंचला बनकर, राष्ट्रवादी काँग्रेस महिला शहर अध्यक्ष उषा आहेर, भाजप युवा मोर्चाचे नितेश पाटील, युवासेना खारघर प्रमुख ओंकार वेदांते, रि.पा.ई. युवक आघाडी सरचिटणीस डॉ. विजय मोरे, संतोष सोनकांबळे, राष्ट्रवादीचे तळोजा ग्रामीण अध्यक्ष अनिल पाटील हे होते.

खारघरमध्ये झालेल्या कार्यक्रमाचे आयोजन भाजप खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, शिवसेना खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, रि.ब.वि.प.चे सरचिटणीस सुशील महाडिक, राष्ट्रवादीचे खारघर शहर अध्यक्ष बळीराम नेटके यांनी केले होते.

## सलग सुट्ट्यांमुळे माथेरान पर्यटकांनी गजबजले



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची संख्या वाढत असून सलग सुट्ट्यांमुळे आणि स्वस्त दरात सुरक्षित ई-रिक्षा सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पर्यटकांचा ओघ माथेरान पर्यटनस्थळाकडे वाढत असून जागतिक दर्जाचे सुंदर असे युनिक पर्यटनस्थळ पर्यटकांनी गजबजून गेलेले होते.

आल्हाददायक निसर्गाने नटलेले माथेरान पर्यटनस्थळ हे नुसते पर्यटनस्थळ नसून युनिक पर्यटनस्थळ आहे. येथे वाहनांचा कर्कश आवाज नाही, वायू प्रदूषण नाही, ध्वनी प्रदूषण नाही म्हणून तर इतर पर्यटनस्थळांपेक्षा माथेरान युनिक आहे.

सध्या ऊन आणि हिरवा निसर्ग त्यातच खळखळणारे झरे हे नयनरम्य दृश्य पाहण्यासाठी सुट्ट्यांच्या हंगामात येथे पर्यटक मोठ्या प्रमाणावर दाखल झाले आहेत. त्यातच पर्यावरणपूरक स्वस्त दरात सुरक्षित अशी ई-रिक्षा सुरू झाल्यामुळे पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस माथेरानकडे वाढत आहे. येथील सर्व हॉटेल्स, लॉज हे पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. सलग सुट्ट्यांमुळे पर्यटकांनी आपल्या आवडत्या हॉटेल्स, लॉजमध्ये रूम अगोदरच आरक्षित केले होते. तर येथे अचानक दाखल झालेले काही पर्यटक रूम साठी थोडी फार धावपळ करताना दिसत होते. पावसाळ्यातील वाढते पर्यटन हंगामामुळे पॉईंटवरील स्टॉलधारक आणि दुकानदार व्यापारी वर्ग हॉटेल व्यावसायिक, लॉज धारक, अश्वचालक समाधान व्यक्त करीत आहेत.

*माथेरानच्या वाढत्या पर्यटनाचे मुख्य कारण म्हणजे येथे सुरू झालेली ई-रिक्षा आहे. माथेरान प्रवेशद्वार ते बाजारपेठ असे अडीच किलोमीटर अंतरासाठी फक्त ३५ रुपये प्रति प्रवासी इतक्या वाजवी दरात ई-रिक्षा सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे पर्यटकांचा वेळ आणि पैसा अशी दोघांची बचत होते. ई-रिक्षा सेवा सुरू व्हावी याकरिता आमच्या भारतीय जनता पक्षाने सर्वप्रथम, बिनशर्त पाठिंबा दिला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांचेदेखील सहकार्य मिळाले. त्यामुळे माथेरानकरांना चांगला व्यवसाय उपलब्ध होत आहे.*

**-प्रदीप घावरे,** भाजप शहर संपर्क प्रमुख, माथेरान

## बंध अतूट नात्याचे..!



**पनवेल : भावा-बहिणीच्या अतूट नात्याचे प्रतिक असणाऱ्या रक्षाबंधन सणानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर त्यांच्या बहिणींनी त्यांना ओवाळून व राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बहिणींना रक्षाबंधनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.** (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# 'त्यांना' १५०० रुपयांची किंमत कशी कळणार -चित्रा वाघ

## लाडकी बहीण योजनेवरील टीकेनंतर प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेचे फॉर्म हे सावत्र भावांनी चुकीचे भरल्यामुळे महिलांना या योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी येत असल्याचे वक्तव्य राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे यांनी टीका करीत गृहमंत्रीच असे म्हणत असतील तर त्याची चौकशी झाली पाहिजे. तुमचेच पोर्टल असून त्यावर अशी चुकीच्या पद्धतीने माहिती भरली गेल्यास त्यावर राज्य सरकार करताय तरी काय? असा प्रश्न उपस्थित केला होता. या टीकेला आता भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी एक्सवर



एका पोस्टच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिले आहे.

प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी म्हटले आहे की, बारामतीच्या मोठ्या ताई सुप्रिया सुळे तुम्ही गल्लत करताय. प्रेम प्रेमाच्या जागी असते आणि कुटुंबाची चिंता कुटुंबातच. ज्यांना छोट्या-छोट्या गोष्टींसाठी संघर्ष करावा लागतो, त्यांनाच १५०० रुपयांचे मोल कळते. लवासाताई, ११० कोटी रुपये जे फक्त वांग्यातून कमवतात, त्यांना ते कसे कळणार? असा प्रश्न उपस्थित करीत चित्रा वाघ यांनी सुप्रिया सुळे यांचा उल्लेख लवासाताई असा केला. पुढे बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या की, आणि हो ज्यांना प्रेम असते, तेच लोक योजना आणतात. जे फक्त स्वतःचा विचार करतात, त्यांना अशा योजना सुचू शकत नाही. त्यामुळे विरोध करण्यापलिकडे तुमच्याही हाती काहीच असल्याची टीका ही त्यांनी केली.

महायुतीचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेतून तीन हजार रुपये देऊ. सोबतच यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील कार्यक्रमात बोलताना म्हटले, तर पुढील पाच वर्षांसाठी ही योजना निश्चित सुरू होईल, महिला भगिनींना पाच वर्षांचे ९० हजार रुपये मिळतील, असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातल्या बालेवाडीतील कार्यक्रमातून दिला.

या घोषणेनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर टीका केली होती. सुरुवातीला महाविकास आघाडीने अशी घोषणा केल्याने ते आता म्हणालेत, मात्र ते फक्त सत्तेत परत येण्याची भाषा करीत आहेत. नेहमी मतांचीच भाषा ते करीत आहेत. लाडकी बहीण योजनेशिवाय या सरकारकडे दुसरे काहीही नाही. १५०० रुपयात महिलांचे मत विकत घेण्याचा कार्यक्रम या सरकारने सुरू केला असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी सरकारवर केली होती.

# चणेरा भागात आरसीएफ वाढीव प्रकल्प कार्यान्वित होणार

## आमदार महेंद्र दळवी यांची माहिती



**मुरूड : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चणेरा भागात मागे मेडिकल हब प्रकल्प होणार होता, परंतु स्थानिकांनी विरोध केल्याने हा प्रकल्प दुसरीकडे गेला. आता नवीन घडामोडी झाल्या असून आरसीएफ कंपनी चणेरा भागात दोन हजार एकर जमिनीवर आपला वाढीव प्रकल्प करणार असून यामधून स्थानिक तरुणांना दहा हजार नोकऱ्या प्राप्त होणार आहेत. तेव्हा स्थानिकांनी या प्रकल्पाला विरोध न करता सहकार्य करावे जेणेकरून आपली प्रगती साध्य करता येईल, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.

मुरूड शहरात केलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी शहर प्रमुख संदीप पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत आमदार बोलत होते. या वेळी माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, शहराध्यक्ष संदीप पाटील, सुपारी संघाचे चेअरमनअविनाश दांडेकर, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, माजी सरपंच विलास सुर्वे, परेश किल्लेकर, विघ्नेश माळी, महेश पाटील, यशवंत पाटील, दिनेश मिणमिणे आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार दळवी यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील कोळी समाजाला न्याय देण्यासाठी सर्व समाज एकत्र करून कोळी महासंघ निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. या महासंघाचे महामंडळ होण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी अनकुलता दर्शविली असून यामुळे कोळी समाजास मोठी आर्थिक मदत प्राप्त होईल असा विश्वास या वेळी त्यांनी व्यक्त केला आहे.

समुद्रकिनाऱ्याचे सुभोभिकरण अंतिम टप्प्यात असून पर्यटकांना विविध मत्स्य प्रजाती न्याहळत्या याव्यात आणि सागर संपत्तीचा परिचय व्हावा, यासाठी पर्यटकांना रत्नागिरीच्या धर्तीवर सुमारे ८५ कोटींचे सागरी मत्स्यालय व प्राणी संग्रहालय मुरूड येथे उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तालुक्यात आतापर्यंत २०० कोटींहून अधिक विकासकामे केल्याची माहिती त्यांनी दिली. साळाव-आगरदांडा रस्त्यासाठी २७ कोटी ५० लाख रुपये खर्च करून पर्यटनासाठी रस्ते सुलभ झाले असून सवतकडा, नवेदर, गारंबी पाणी योजनेसाठी ६६ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचा ४० वर्षे प्रलंबित विषय मार्गी लागल्याने येत्या डिसेंबर अखेर हा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे, तसेच श्री कोटेश्वरी देवस्थानसाठी धर्मशाळा व हिंदू बोर्डिंगसाठी निधीचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे ते म्हणाले.

शिवसृष्टीसाठी दिड कोटी, विविध समाज मंदिरांसाठी दोन कोटी ८५ लाख तर मुख्य प्रवेशद्वारासाठी ६५ लाख रु. मिळून पाच कोटींचा निधी प्राप्त केला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# ऑनलाईन धान्यवाटप सुरू झाल्याने ग्राहकांची गर्दी

**पनवेल : वार्ताहर**

गेले काही महिने ऑनलाईन धान्य वाटप तांत्रिक अडचणीमुळे धान्य वाटप बंद होते, परंतु गेल्या दोन दिवसांपासून ऑनलाईन धान्यवाटप पूर्ववत सुरू झाल्याने ऐन सणासुदीच्या दिवसात लाभार्थींना धान्य मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांनी दुकानात गर्दी केली आहे.

शासनामार्फत मध्यमवर्गीयांना तसेच तळागाळातील सामान्य नागरिकांना रास्त भाव धान्य दुकानाच्या माध्यमातून धान्य वाटप करण्यात येते. त्याचा फायदा लाखो ग्राहकांना होत असतो. पनवेलमध्येसुद्धा अशा प्रकारची शेकडो दुकाने आहेत. गेले काही महिने शासनामार्फत देण्यात येणारे ऑनलाईन धान्य वाटप तांत्रिक अडचणीमुळे रास्त भाव धान्य दुकानदारांना लाभार्थींना वाटप करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे




लागत होते. ही अडचण दूर झाल्याने आता गेल्या काही दिवसांपासून ऑनलाईन धान्य वाटप पूर्ववत सुरू झाल्याने ऐन सणासुदीच्या दिवसात लाभार्थींना धान्य मिळत असल्याने ग्राहकांनी दुकानात गर्दी होत आहे.

**माझ्याकडे ७०० रेशनिंग कार्डधारक असून शासनाची ऑनलाईन सेवा पूर्ववत होताच या सर्वांना संपर्क साधून त्वरित रेशन घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे.**
**-प्रतिक बहिरा, दुकान विक्रेते**

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात पर्यटन हंगाम सुरू असून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. रविवारी (दि.१८) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २६५ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ४५ हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# उरणमधील करंजा द्रोणागिरी हायस्कूल येथे नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी

**उरण : वार्ताहर**

नारळी पौर्णिमा सणाचे कोळी बांधवांमध्ये विशेष महत्त्व आहे. दोन महिने समुद्रात मासेमारी बंद असते. कोळी बांधव सागराची पूजा करून नारळ वाहतात व सागरा आता शांत हो आमच्या कोळी बांधवांना भरपूर मच्छी मिळू दे, आमचे रक्षण कर, अशी प्रार्थना करतात व मासेमारीला सुरुवात करतात.

रयत शिक्षण संस्थेचे द्रोणागिरी हायस्कूलच्या वतीने नारळी पौर्णिमा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नारळाची मोठ्या आकाराची प्रतिकृती बनवून त्याची पूजा केली. विद्यार्थ्यांनी पारंपारिक कोळी नृत्य सदर केले. महिलांनी



झाडांना राखी बांधून पर्यावरण पासून आमचे रक्षण कर, अशी प्रार्थना केली. नारळाच्या प्रतिकृतीस मराठी मध्यमचे चेअरमन सीताराम नाखवा, व्हाईस चेअरमन के.एल.कोळी, करंजा सरपंच अजय म्हात्रे, इंग्रजी माध्यमचे चेअरमन हर्षद कोळी, करंजा मच्छिमार सोसायटी चेअरमन प्रदीप नाखवा, व्हाईस चेअरमन राजेंद्र कोळी यांच्या हस्ते पूजा करून वाजत गाजत, लेझीम पथक, कोळी नृत्य, मिरवणूक काढून नारळ सागरास अर्पण करण्यात आला.

या वेळी मुख्याध्यापिका सुरेखा म्हात्रे, इंग्रजी माध्यमच्या मुख्याध्यापिका एस.डी. कोळी, शिक्षक डॉ. ग्रीष्मा नाखवा, द्रोणागिरी ब्रास बॅन्ड पथक, पत्रकार दिनेश पवार, मनोहर कोळी, स्कूल कमिटी सदस्य, देविदास थळी, विद्यार्थी, कोळी बांधव उपस्थित होते.

# सिंधुदुर्गात मासेमारीला गेलेली नौका दुर्घटनाग्रस्त

## तिघांचा बुडून दुर्दैवी मृत्यू

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

मालवण तालुक्यातील सर्जेकोट येथून मासेमारीला गेलेली पात नौका आचरा नजीकच्या समुद्रात दुर्घटनाग्रस्त होऊन नौकेतील चारही मच्छिमारांनी नौकेतून समुद्रात उडी घेतल्याने तिघांचा बुडून मृत्यू झाला तर एकाने पोहत येऊन पहाटे आचरा किनारा गाठल्याने त्याचे प्राण वाचले. मृत झालेल्या तिघांमध्ये नौकामालक व सर्जेकोट सोसायटीचे चेअरमन, सेवानिवृत्त शिक्षक गंगाराम उर्फ जीजी आडकर यांच्यासह खलाशी प्रसाद भरत सुर्वे (वय ३२), लक्ष्मण शिवाजी सुर्वे (वय



६५) यांचा समावेश आहे, तर विजय अनंत धुरत (वय ५३, रा. मोर्वे देवगड) यांनी किनारा गाठण्यात यश मिळविले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सर्जेकोट येथील गंगाराम आडकर हे रविवारी (दि.१८) रात्री आपली जनता जनार्दन या नावाची मच्छीमारी नौका घेऊन तीन खलाशांसह समुद्रात मासेमारीला गेले होते. कुणकेश्वर येथील समुद्रात मासेमारी करून जाळी ओढल्यावर ते माघारी परत असताना मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास धुक्यामुळे नौका हेलकावे घेऊन पाणी भरू लागल्याने जीव वाचविण्यासाठी चौघांनीही समुद्रात उड्या घेतल्या.

सोमवारी (दि.१९) पहाटे यातील विजय धुरत हे आचरा बंदर नजीकच्या समुद्रातून पोहत येताना दिसून आले, तर अन्य तिघे मच्छिमार बेपत्ता होते. सकाळी हिर्लेवाडी व वायंगणी किनाऱ्यावर तिन्ही बेपत्ता मच्छिमारांचे मृतदेह सापडून आले. हे मृतदेह आचरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत, तर पोहत आलेल्या विजय धुरत यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.

# रोह्यात व्यावसायिकांसाठी वर्कशॉप; २५ व्यावसायिकांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र बिझनेस क्लब व दसबा फाऊंडेशनच्या वतीने व्यावसायिकांसाठी वर्कशॉप घेण्यात आले. या वेळी रोह्यातील २५ व्यावसायिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

रायगड जिल्हा तसेच रोहा तालुक्यातील विविध व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रगत आणि यशस्वी उद्योजकांचा विशेष सन्मान उभय संस्थेच्या माध्यमातून



करण्यात आले. या वेळी उपस्थित व्यावसायिकांना युवा बिझनेस पुणे गरुड झेप स्वप्नांच्या दिशेने यावर बिझनेस कोच विजय कोटगोंड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यानंतर माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते नामांकित व्यवसायिकांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये अर्जुन गोरीवले, नरेंद्र जाधव, मंगेश भोईर, जितेंद्र गिजे, गीतराज म्हस्के, धर्मराज माने, अशोक कोतवाल, सुमित गोपिलकर, रामचंद्र नाकती, सखाराम बर्जे, अनंत मगर, नितीन बामुगडे, नारायण भोसले, नारायण कान्हेकर, नामदेव म्हसकर, राजेश कदम, निवास पवार, अभिषेक गोतावडे, अक्षता शिंदे, रुचिका जैन, विजय जाधव, मनीष खिरीट, गणेश भोकटे, पराग मोरे आदींसह २५हून अधिक व्यवसायिकांना या वेळी सन्मानित करण्यात आले.

माजी आमदार अनिकेत तटकरे, पी. पी. बारदेस्कर यांनी मनोगत व्यक्त केले, तर कार्यक्रमास विजयराव मोरे, शंकर भगत, सुरेश मगर, रामचंद्र सकपाळ, अनिल भगत, मिलिंद आष्टीवकर, अमित घाग, सुहास खरीवले, रविंद्र मरवडे सह महाराष्ट्र बिझनेस कोच विजय कोटगोंड, मुख्य समन्वयक योगेश कडवेकर आदी उपस्थित होते.

# मुरूडमध्ये पारंपरिक पद्धतीने नारळी पौर्णिमा उत्साहात साजरी

**मुरूड : प्रतिनिधी**

समुद्राकाठी राहाणाऱ्या कोळी लोकांचा नारळी पौर्णिमा हा महत्त्वाचा सण आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो. बोटी, जहाजांची वर्दळ या काळात बंद असते. समुद्राचा कोप होऊ नये, जहाजे, नौका सुरक्षित राहाव्यात, समुद्र शांत होण्यासाठी कोळी बांधवांसह शहरातील नागरिकांच्या वतीने सजवलेल्या सोन्याच्या नारळाची पुजा करून भव्य मिरवणूक लक्ष्मीखार येथील बापदेव मंदिरापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत काढण्यात आली. त्यानंतर सोन्याच्या नाराळाचे पुजन व आरती करून दर्याराजाला सोन्याचा नारळ अर्पण करण्यात आला.

या वेळी अविनाश दांडेकर, प्रमोद भायदे, महेश भगत, संदिप पाटील, प्रकाश राजपुरकर, अनंत पाटील, किर्ती शहा, रूपेश जामकर, विजय सुर्वे, पांडुरंग आरेकर, मंगेश दांडेकर, मोहन करंदेकर, अरविंद गायकर, प्रवीण बैकर, आदेश दांडेकर, अच्युत पोतदार, निलेश राजपुरकर, दिपक राजपुरकर, नयन कर्णिक, अशोक कमाने, अजित गुरव आदींसह समाज पाखाडी अध्यक्ष व कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुरूड पोलीस निरीक्षक उदय झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अविनाश पाटील, सहाय्यक फौजदार दिपक राऊळ, शिपाई विक्रांत बांधणकर, कैलास डिमसे आदींसह पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# म्हाडाची फेक वेबसाईट बनवणाऱ्या दोघांना अटक

**मुंबई :** म्हाडा मुंबई मंडळाने नुकतीच २०३० परवडणाऱ्या घरांची सोडत जाहीर केली आहे. ९ ऑगस्टपासून म्हाडा घरांच्या लॉटरीसाठी ऑनलाईन अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. या लॉटरीच्या नावाखाली लोकांची फसवणूक केली जात असल्याचे समोर येत आहे. सायबर चोरट्यांनी म्हाडाची वेबसाईट तयार करुन लोकांची ऑनलाईन फसवणूक केली आहे.

म्हाडाने मुंबईमध्ये २०३० घरांची लॉटरी काढली असून अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. त्याचाच फायदा घेऊन म्हाडाच्या जाहिरातीचा आधार घेत म्हाडाच्या घरासाठी अर्ज करण्यास फेक वेबसाईट बनवून नागरिकांची लूट करण्यात येत आहे. म्हाडाने याची दखल घेत पोलीस स्थानकांमध्ये याची तक्रार दाखल केली होती. घरासाठी डिपॉझिट रक्कम म्हणून भरण्यात येणाऱ्या ५० हजार आणि एक लाख रुपयांच्या रकमेतून मोठा अपहार करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यानंतर म्हाडाने मुंबई पोलिसांच्या सायबर विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्यामध्ये दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

# लाडक्या बहिणींचा देवाभाऊ कार्यक्रमाला नवी मुंबईत प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

लाडकी बहीण योजना सुरू करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमाला नवी मुंबईत लाडक्या बहिणींची प्रचंड उपस्थिती लाभली. भाजप नवी मुंबई महिला मोर्चाच्या वतीने कोपरखैरणे येथे आयोजित या कार्यक्रमास पाच हजारांच्या आसपास लाडक्या बहिणी एकत्र आल्या होत्या. फटाक्यांची आतषबाजी, संगीत, ढोल ताशांच्या गजरात लाडकी बहिण योजनेचा आनंद साजरा करण्यात आला.

आमदार गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार तथा नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, भाजप प्रदेश महिला उपाध्यक्ष प्रा. वर्षा भोसले, माजी महापौर जयवंत सुतार, नवी मुंबई भाजप महिला मोर्चाध्यक्षा माधुरी सुतार, महामंत्री नेत्रा शिर्के यांच्यासह महिला लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमांतर्गत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील लाडक्या बहिणीशी ऑनलाइन संवाद साधला. लाडकी बहीण योजनेसाठी महिलांनी देवा भाऊंचे आभार मानले. या योजनेमुळे आम्हाला आधार मिळाला असून ही योजना सुरूच ठेवण्याचे आवाहन महिलांनी केले. त्याचबरोबर भाऊ म्हणून राज्यातील बहिणींच्या पाठीशी उभे राहण्याची विनंती केली. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी योजना सुरूच राहणार असून लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे त्यांच्या सक्षमीकरणांच्या योजना हाती घेऊ शकलो. देशाचा विकास करायचा असेल तर महिला भगिनींना विकासाच्या मुख्य धारेत आणणार असल्याची ग्वाही दिली.

## निवडक

### अज्ञात चौकडीकडून एकाची हत्या

**पनवेल** : अज्ञात चौकडीने तीक्ष्ण हत्याराने एका इसमाची हत्या केल्याची घटना पनवेलजवळील उसर्ली येथे घडली आहे. विजय कळसे (२७ रा.मानखुर्द) यांची चार अज्ञात इसमांनी अज्ञात कारणावरून तीक्ष्ण हत्याराने त्याच्या छातीच्या डाव्या बाजूला भोसकून त्याची हत्या केली आहे. त्यानंतर हे संशयित इसम पसार झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक भगत आदींच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे व पथकाने घटनास्थळी धाव घेतली आहे. यासंदर्भात अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके रवाना झाली आहेत.

### स्कुटीच्या डिकीमध्ये आढळला मद्यसाठा

**पनवेल** : स्कुटीच्या डिकीमध्ये देशी आणि विदेशी मद्य सापडल्या प्रकरणी प्रदीप निशाद नावाच्या व्यक्तीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दुचाकीवर मद्याची विक्री होत असल्याची माहिती कामोठे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कामोठे पोलीस पथकाने प्रमिला बियर शॉपीच्या समोर कामोठे येथे सापळा रचला असता, त्या वेळी एका स्कुटीवर एक इसम बसलेला दिसला. स्कुटीची डिकी उघडली असता डिकीमध्ये १० हजार ५५५ रुपये किमतीचे देशी-विदेशी मद्य मिळाले. याप्रकरणी प्रदीप सूर्यभान निशाद याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### किरकोळ वादातून मारहाण

**पनवेल** : मुंडी भाजण्याचा जाब विचारल्याने शिविगाळ करून स्टील पाईपने मारहाण केल्याचा प्रकार खारघर येथे घडला आहे. याप्रकरणी मुन्ना नामक इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत हकीकत अशी की, मिथिलेश कुमार गुप्ता हे से.१२ खारघर येथे राहतात. त्यांच्या दुकानाशेजारी मुन्ना मटन शॉप आहे. या ठिकाणी कापलेल्या जनावरांचे मुंडी व पाय गॅसवर भाजत असल्याने त्याचा वास येऊन त्रास होतो. याबाबत त्याठिकाणी मुंडी व पाय न भाजण्याबाबत संबंधिताला समज देण्यात आली होती. मिथिलेश कुमार दुकानावर असताना मुन्ना यांच्या दुकानाच्या मागे मुंडी भाजू लागला. या वेळी त्याने शिविगाळ केली आणि स्टीलच्या पाईपने मिथलेश कुमार यांना मारहाण केली. त्यानंतर पुन्हा मारण्याची धमकी दिली. त्यामुळे मुन्नाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कर्नाळा अभयारण्यात दोघांना लुटले

**पनवेल** : कर्नाळा अभयारण्यात पक्षी निरीक्षण करण्यासाठी गेलेल्या दोघा जणांना अज्ञात दोन व्यक्तींनी धारदार चाकू व छर्याच्या बंदुकीचा धाक दाखवून गळ्यातील सोन्याची चेन जबरीने चोरी केल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अय्यप्पन हरिहरसुब्रमण्यम (४५ रा.चेंबुर) व त्यांचे रविशंकर मंथा असे दोघे कर्नाळा अभयारण्यात पक्षी निरीक्षण करीत असताना या दोघांकडे दोन अज्ञात इसम आले व त्यांनी त्यांच्याकडील धारदार चाकू तसेच छऱ्याच्या बंदुकीचा धाक दाखवून अय्यप्पन हरिहरसुब्रमण्यम यांच्या गळ्यातील जवळपास एक लाख २० हजार रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन व अय्यप्पा स्वामींचे दोन ग्रॅमचे पेंडंट असा सोन्याचा ऐवज काढून घेऊन त्यांना धमकावून ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बहिणींच्या रक्षणासाठी सदैव तत्पर | आमदार महेश बालदी यांचे अभिवचन

## रानसईमधील आदिवासी भगिनींसह रक्षाबंधन साजरे





**उरण : रामप्रहर वृत्त**

बहिणींच्या रक्षणासाठी आणि त्यांच्या प्रत्येक गोष्टीत साथ देण्याचे अभिवचन आपल्या सर्वांसमोर देतो, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी सोमवारी (दि.१९) रानसईमध्ये दिले, तसेच जात, धर्म, भाषा, पंथ बघून जो काम करतो तो जातीतच गुरफटला जातो. त्यामुळे विरोधकांना माझ्याविरूद्ध बोलण्यासाठी फक्त जातीचाच मुद्दा आहे, अशी टीकाही विरोधकांवर केली.

रक्षाबंधन सण हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र सण आहे. हा सण श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला साजरा केला जातो. हा सण उरणचे आमदार महेश बालदी यांनी रानसईमधील आदिवासी बहिणींसोबत साजरा केला. या वेळी बहिणींना भेट म्हणून साड्यांचे वाटप केले. या कार्यक्रमाला शेकडो आदिवासी बहिणींनी उपस्थित राहून आमदार महेश बालदी यांना राखी बांधून रक्षणाचे वचन घेतले.

या वेळी भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवीशेठ भोईर, रानसई विभागीय अध्यक्ष श्याम लेंडे, विद्याधर जोशी, जीवन टाकले, राजू पाटील, सरपंच राधा पारधी, उपसरपंच सुरेश पारधी, सदस्य रेखा चौधरी, बेबी शिंगवा, राधा दोरे, युवानेते समीर मढवी, दीपिका दोरे, नागेश केंगे, नारायन बरतोंड, नामदेव पारधी, महादेव भगत, अशोक कवठे, बाळाराम चौधरी, अनिल भगत, अशोक कवटे, गोपीशेठ म्हात्रे यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## सामाजिक संवाद मेळाव्याला आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विवेक विचार मंच आणि सहयोगी संघटनांच्या वतीने वंचित घटकांमध्ये कार्य करणाऱ्या सामाजिक नेतृत्व आणि संस्थांच्या प्रतिनिधींचा सामाजिक संवाद मेळावा कामोठ्यात रविवारी (दि. १८) झाला. या मेळाव्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या मेळाव्यातून अनुसूचित जाती आणि वंचित घटकांचे प्रश्न, सद्यस्थिती, भारतीय संविधान, आरक्षण, सामाजिक न्याय तसेच अत्याचाराच्या विविध घटना, घडामोडी, शासकीय योजना, धोरण अशा विषयासंदर्भात संवाद झाला. मेळाव्यात उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक न्यायाच्या अनेक विषयांवर मते व्यक्त केली, तसेच संवाद सत्रामध्ये आरोग्य , शिक्षण आणि रोजगार या विषयांवर चर्चा झाली. या वेळी विवेक विचार मंचाचे कोकण प्रांत संयोजक विजय वेदपाठक यांनी संविधान बदल होणार आहे का, याबद्दल आपणास काय वाटते आणि ही जर अफवा आहे तर का पसरवली गेली असे विचारले असता हे फेक नॅरेटिव्ह संविधांबद्दल अनास्था निर्माण करणारे असल्याचे सांगण्यात आले. अॅड. संदीप जाधव यांनी तांत्रिकदृष्ट्या संविधानाचा गाभा, मूलतत्त्वे कधीच बदलता येणार नाही असे सांगितले.

प्रमुख वक्ते भरत अमदापुरे यांनी, देशाची एकता आणि अखंडितता भारतीय संविधानामुळे अबाधित राहिली आहे, असे प्रतिपादन केले. समाजातील सर्व घटकांना सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाची संधी संविधानामुळे प्राप्त झाल्याचे सांगितले. वर्तमान केंद्र सरकारने संविधानातील ३७० कलम संदर्भातील सुधारणा केल्यामुळे काश्मीरमधील अनुसूचित बांधवांना आता आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याचे अधोरेखित केले.

मेळाव्याला गटप्रमुख प्रमोद रामचंद्र सावंत, नागसेन गमरे, वसंत सुर्वे, छाया गवई, अमित जाधव, मयूर मोहिते, दीपक पवार, अविनाश गायकवाड, विष्णू गायकवाड, चेतन कांबळे, सुरेंद्र हळदिकर, शिलकुमार कांबळे, अमोल जाधव, अनंता गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे आरोग्य तपासणी



**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत आयोजित केली जाणारी वनवासी आश्रम विद्यार्थी आरोग्य दत्तक योजनेंतर्गत सालाबाद प्रमाणे सोमवारी (दि.१९) चिंचवली वनवासी कल्याण आश्रम येथील विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. तपासणी शिबिरात विद्यार्थ्यांसह तेथील स्टाफचीदेखील तपासणी करण्यात आली.

क्लबचे वैद्यकीय संचालक डॉ. लक्ष्मण आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजय भगत, डॉ. नितीन म्हात्रे, डॉ. रमेश पटेल, डॉ. आमोद दिवेकर, डॉ. राजेश गांधी, डॉ. प्रसन्ना चंद्रात्रे, डॉ. मिलिंद घरत यांचे सह अनेट डॉ. ऐश्वर्या पवार व डॉ. अक्षता कचरे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून औषधोपचार केले तसेच दातांची निगा, मुखशुद्धी कशी राखायची याबद्दल डॉ. ऐश्वर्या यांनी मार्गदर्शन केले व डॉ. अक्षता यांनी शारीरिक तंदुरुस्ती कशी राखायची याचे मार्गदर्शन केले. शिबिरास अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दिपक गडगे यांचेसह संचालक मंडळातील पदाधिकारी, अनेक क्लब सदस्य उपस्थित होते.

## पावसाच्या पुनरागमनाने पनवेलकर सुखावले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या १०-१२ दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने नारळीपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर पुनरागमन केल्याने पनवेलकर सुखावले.

जुलै महिन्यात धुमाकूळ घालणाऱ्या पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून मात्र दडी मारली होती. त्यामुळे नागरिक पुन्हा एकदा उकाड्याने हैराण झाले होते. मुसळधार पावसामुळे धरणे भरली असली तरीदेखील हवेत गारवा नसल्याने घामाच्या धारा लागल्या होत्या. त्यामुळे पनवेलमधील नागरिक पावसाची आतुरतेने वाट बघत होते. श्रावण महिना असूनही पावसाने दडी मारली होती, सोमवारी नारळीपौर्णिमेच्या मुहूर्तावर पावसाने पुनरागमन केल्याने हवेत काहीसा गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे पनवेलकर सुखवले.



**उरण : केंद्रीय सामाजिक व न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सदिच्छा भेट कामगार नेते सुरेश पाटील, संजय गायकवाड, कामगारनेते डी. पी. सोनावणे, नुरा शेख, उद्योगपती नितीन शेट, प्रहालाद कासकर यांनी घेतली.**

## आदईजवळ चारचाकी गाडीला भरधाव ट्रकची मागून धडक

### एक ठार; तिघे जण जखमी





**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील आदई गावाजवळील ब्रीजजवळ पुढे जाणाऱ्या वाहनाला भरधाव वेगाने पाठीमागून आलेल्या ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात गाडीतील एका महिलेचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे, तर इतर तिघे जण जखमी झाले आहेत.

पनवेलजवळील आदई गावाजवळील ब्रीजवरून दिनेश शिंदे (४५ रा.नेरुळ) हे त्यांच्या (एमएच १२ एचएफ१७८९) गाडीतून मुंबई-पुणे महामार्गावरून मुंबईकडे जात असताना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील किमी.२/६५० या ठिकाणी त्यांनी त्यांच्या गाडीचा वेग कमी केला असता, पाठीमागून येणारा ट्रक (टीएन ३४ झेड ८९७४) वरील चालक वेडीवेल (३६ रा.तामिळनाडू) याला ट्रक नियंत्रित न झाल्याने पुढे असणाऱ्या कारला पाठीमागून धडक दिली. या अपघातात गाडीतील निर्मला जनार्दन शिंदे (६२) या गंभीररित्या जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर दिनेश शिंदे, शिल्पा दिनेश शिंदे व वैष्णव दिनेश शिंदे हे जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्र पळस्पेचे पथक, पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे व त्यांचे पथक खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परशंकर तसेच आयआरबी पथक घटनास्थळी पोहचले व त्यांनी जखमींना एमजीएम रुग्णालय कामोठे येथे हलविले. त्याचप्रमाणे महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या घटनेनंतर ट्रक चालक पसार झाला असून त्याचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

## ज्येष्ठ कार्यकर्ते हभप वसंतशेठ यांचे अभिष्टचिंतन



**उलवे : रामप्रहर वृत्त**

कोपर येथील भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते हभप वसंतशेठ पाटील यांचा वाढदिवस उत्साहात झाला.

वसंतशेठ हे कोपर गावचे माजी अध्यक्ष तसेच नादब्रम्ह साधना मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिष्टचिंतन केले, तसेच उपसरपंच विजय घरत, सुधीर ठाकूर, रामदास घरत, गजानन ठाकूर, राजेश पाटील, अनंत ठाकुर, बी.टी. कांबळे, किशोर पाटील, नितीन ठाकूर यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## पनवेल प्रारूप विकास योजनेच्या नकाशाबाबत विकास योजना कक्ष स्थापन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण ८ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार पनवेल महापालिका क्षेत्रासाठी प्रसिद्ध केलेले सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेच्या नकाशाबाबत नागरिकांना काही प्रश्न उद्‌भवल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी पनवेल महानगरपालिका अग्निशमन इमारत तिसरा मजला येथे विकास योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**नागरिकांना प्रश्न उद्‌भवल्यास खालील नमूद अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **१. विठ्ठल धायगुडे** (८१०४७४९९७३) गावाचे नाव : पनवेल, नागझरी, चाळ, घोट, धानसर, धरणगाव, धरणाकॅम्प, तुर्भे, पिसार्वे | **२. रणजीत कोरे** (९९७०४२६७३७) गावाचे नाव : रोहिंजण, बीड, आडवली, तळोजा मजकूर, कोयनावळे, करवले बुद्रुक |
| **३. अनिकेत दुर्गवले** (७५०७०२१३६२) गावाचे नाव: कळंबोली-रोडपाली, कामोठे, नवीन पनवेल, आसुडगाव, टेंभोडे, काळुंद्रे, खारघर, ओवे, देवीचा पाडा, पालेखुर्द | **४. शुभम गायकवाड** (९४२०६०६६९९) गावाचे नाव : पडघे, वळवली, तळोजे पाचनंद, नावडे, तोंडरे, पेंधर, खिडूकपाडा. |

या सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेचे नकाशे पनवेल महापालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर नागरिकांना अवलोकनार्थ उपलब्ध आहेत. हे नकाशे अॅन्ड्रॉईड व आय फोनवर अगदी सहज डाऊनलोड करता येऊ शकतील असे उपलब्ध आहेत. नकाशाची प्रत किंवा भागशः नकाशा पाहिजे असल्यास शुल्क आकारून नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुधारित व एकत्रित प्रारुप विकास योजनेबाबत नागरिकांना सूचना व हरकती घेण्याची मुदत ही ७ सप्टेंबरपर्यंत आहे. याबाबत काही शंका असल्यास विकास योजना कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

## खारघर पोलिसांना राखी बांधून रक्षाबंधन उत्साहात साजरे

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पोलीस वर्षभर जीव धोक्यात घालून नागरिकांचे संरक्षण करीत असतात. महत्त्वाचे सण कुटुंबियांसोबत एकत्रित साजरे न करता कर्तव्य पार पाडत असतात. याचे भान ठेवून खारघर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी महिला व पुरुष पोलीस व वाहतूक पोलीस यांच्यासोबत रक्षाबंधन साजरे केले.

खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे यांनी, वर्षभर कर्तव्य करीत असताना नागरिकांचे रक्षण करण्याचे आव्हान पोलीस यंत्रणेसमोर असते. त्याची उतराई म्हणून पोलिसांना राखी बांधून, मिठाई व चॉकलेट वाटून उत्साहात हा सण साजरा कारण्यात आल्याचे सांगितले. या वेळी उत्तर भारतीय मोर्चाध्यक्ष संतोष शर्मा, एनजीओ खारघर शहर राजेंद्र मांजरेकर, सोशल मीडिया अध्यक्ष अजय माळी, प्रदेश वैद्यकीय विद्यार्थी आघाडी सहसंयोजक डॉ. विजय उजलंबे, बेटी बचाव बेटी पढाव खारघर अध्यक्षा प्रिया दळवी, सहयोग स्नेह सेवा संस्थेच्या अध्यक्ष संतोष दीदी, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा सरचिटणीस राजेश पांडेय, उपाध्यक्ष पुष्पा तिवारी, जिल्हा सदस्य भारती मिश्रा, प्रवीण सिंग, मिथीलेश गुप्ता उपस्थित होते.



## जीवन ज्योती आश्रममध्ये रक्षाबंधन

**पनवेल** : राखी पौर्णिमेनिमित्त उपक्रम घेत खारघर येथील जीवन ज्योती आश्रमात राखी बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला.

समाजसेविका चंचला बनकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित परंपरा समाज सेवा संघटनेच्या महिला भगिनींनी आश्रमातील घरापासून बेघर असलेल्या भावांना राखी बांधून त्यांचे आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला परंपरा समाज सेवा संघटनेच्या अध्यक्ष तथा खारघर शिवसेना शहर प्रमुख चंचला बनकर, नूतन गायकवाड, मीरा वीर, वेदिका रेडिज, ज्योती बागले, जयश्री सुखटणकर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# विरोधकांना पोटदुखी

यंदाच्या राखी पौर्णिमेला महाराष्ट्रभरात डंका होता तो निव्वळ 'लाडकी बहीण योजने'चाच. योजनेची घोषणा झाल्यापासून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून महिलांचा योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून त्यामुळे विरोधकांचे मात्र धाबे दणाणले आहे. लाडकी बहीण योजनेमुळेच राज्यातील विधानसभा निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्याची टीका आता विरोधकांनी सुरू केली आहे, याला काय म्हणावे?

**राज्यातील गोरगरीब महिलांना समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांचीही भागीदारी असावी या दूरदृष्टीने महायुती सरकारच्या अर्थसंकल्पात 'लाडकी बहीण योजना' सुरू करण्यात आली, परंतु प्रत्येक गोष्टीचे राजकारण करणाऱ्या व विरोधासाठी विरोध करण्यातच गुंतलेल्या विरोधकांच्या महाविकास आघाडीने या योजनेबाबतही सुरुवातीपासूनच निव्वळ नकारात्मक भूमिका घेतली. आता तर हरयाणासोबत महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची घोषणा न झाल्याने, 'लाडकी बहीण योजने'मुळेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका लांबणीवर टाकल्याची टीका महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी सुरू केली आहे. यापूर्वी सलग तीन वेळा हरयाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या होत्या. त्यामुळे यंदाही त्या एकत्रच होतील अशी काही जणांची अपेक्षा होती, परंतु तपशील नीट तपासले तर हे ध्यानात येईल की हरयाणा विधानसभेचा कार्यकाळ ३ नोव्हेंबरला संपतो, तर महाराष्ट्राच्या विधानसभेचा २६ नोव्हेंबरला. निवडणुकांच्या तारखा घोषित करण्याचा अधिकार सर्वस्वी निवडणूक आयोगाचा आहे. महाराष्ट्रातील पाऊस आणि गणेशोत्सव, दिवाळी आदी सण लक्षात घेऊन राज्यातील निवडणुकांची घोषणा आताच केलेली नाही असे आयोगाने स्पष्ट केले असले तरी महाविकास आघाडीचे नेते मात्र याचा संबंध लाडकी बहीण योजनेशी जोडत आहेत. वास्तवत: अशातऱ्हेने प्रत्येक गोष्टीचे राजकारण करणे पूर्णत: चुकीचे आहे. एव्हाना 'लाडकी बहीण योजने'चा ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता असंख्य लाडक्या बहिणींच्या खात्यात जमाही झाला आहे. रक्षाबंधनच्या सणाआधीच राज्यभरातील माता-भगिनींच्या बँक खात्यात १ कोटी ३ लाख रूपये जमा झाले आहेत. एकंदर १ कोटी ३५ लाख महिला या लाभासाठी पात्र ठरल्या असून जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रूपये लाभार्थी महिलांना देण्यात आले आहेत. राज्यभरातील महिलावर्गात या योजनेमुळे आनंदाचे वातावरण पसरले असले तरी विरोधकांना मात्र आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर सुरू झालेली ही योजना प्रचंड खुपते आहे असे दिसते. ही योजना कशी बारगळेल, त्यात खोडा कसा घालता येईल यासाठी प्रारंभीच काही जण उच्च न्यायालयातही गेले. पण न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली आणि बहिणींच्या बाजूने निकाल दिला. तरीही ही योजना फसवी आहे, हा 'निवडणुकी'पूर्वीचा जुमला आहे, यांसारखे अनेक आरोप विरोधकांकडून केले गेले, पण लाडकी बहीण योजनेसाठी येत्या मार्च महिन्यापर्यंत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असून राज्यातील माताभगिनींनी महायुतीला आशीर्वाद दिला तर पुढील पाच वर्षे या योजनेचे पैसे देत राहू असे नि:संदिग्ध आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर योजनेअंतर्गत आता महिन्याकाठी मिळणारी दीड हजार रूपयांची रक्कम भविष्यात दुप्पट म्हणजे तीन हजार रूपयांपर्यंत वाढवण्याचे संकेतही दिले आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी यासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र आणि राज्य सरकारचा प्रयत्न सुरू असून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल आहे हे विरोधकांच्या कधी लक्षात येणार?**

# महाड तालुक्यात मृत्यूनंतरही नरक यातना

**खबरबात**
**महेश शिंदे**




महाड हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा सांगणारा एक औद्योगिक तालुका आहे. महाराष्ट्रातील इतर तालुक्यांपेक्षा जगात वेगळी ओळख असणारा हा तालुका, संपुर्ण महाराष्ट्रासह अखंड भारताला अभिमान असणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची राजधानी आणि समाधी असणारा हा तालुका आहे. समतेचा संदेश आणि क्रांतीची चळवळ उभा करणारा हा तालुका, भक्तीची परंपरा आणि संस्कृती जपणारा हा तालुका म्हणून ओळखला जातो. नाशिक नंतर सर्वांत मोठी औद्योगिक वसाहत असणारा हा तालुका आहे, मात्र एवढी भुषणे असतानाही महापुर, नैसर्गिक आपत्ती यांची असंख्य संकटे झेलूनदेखील ताट मानेने उभा राहणारा हा तालुका प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मेटाकुटीला आला आहे. या तालुक्याला चांगली आरोग्य सेवा नाही, एवढच काय तर मृत्यू नंतरही शवविच्छेदन करताना नरकयातना भोगाव्या लागत आहेत.

तस पाहीलं तर औद्योगिक वसातीमधील कारखान्यात सतत होणारे अपघात व त्यामुळे होणारे कामगारांचे मृत्यू, मुंबई-गोवा महामार्ग याच तालुक्यातून जात असल्याने या महामार्गावर सततचे अपघात होतात व यामध्ये अनेक लोकाचे प्राण जातात, तसेच दरवर्षी कोणती ना कोणती नैसर्गिक आपत्तीत ठरलेलीच आहे. दरडी कोसळण, पुल वाहून जाण व त्यात होणारी जिवीत हानी. रायगडावर येणाऱ्या पर्यटकांचे दरीत कोसळून होणारे मृत्यू. एवढ कमी की काय तर कोकण रेल्वेच्या वीर ते करंजाडी या ट्रॅकदरम्यान असंख्य अनोळखी मृतदेह सापडत असतात. या सगळ्या मृतदेहांना पोलीस पंचनामे व सगळे सोपस्कार उरकून अखेर शवविच्छेदन गृहात यावे लागते.

खरतर मृत्यूनंतरचा प्रवास हा शांत आणि मुक्तीच्या मार्गाचा प्रवास समजला जातो, मात्र महाड शासकीय रुग्णालयात असलेल्या शवविच्छेदन गृहात असणारी अस्वच्छाता, दुर्गंधी, मृत व्यक्तींच्या व कुजलेल्या मृतदेहांच्या कपड्यांचे ढीक नरक कसा असतो याची कल्पना करून देतात. पूर्वी तुटक्या फुटक्या खोलीत असणारे हे शवविच्छेदन गृह रोटरी क्लब या संस्थेने २००३ साली बांधुन दिले, मात्र आजही या गृहात पाणी नाही. स्वच्छता कर्मचारी नाही त्यामुळे प्रचंड अस्वच्छता व दुर्गंधी येत असते. या ठिकाणी शवविच्छेदन साठी कार्यरत असणारा कर्मचारी हा दहा वर्षांपुर्वीच निवृत्त झाला आहे. त्यानंतर आजताग या ठिकाणी कर्मचारी नियुक्त नाही. जेव्हा केव्हा दुर्घटना घडते तेव्हा शवविच्छेदन करण्यासाठी याच निवृत्त कर्मचार्याच्या हातापाय पडावे लागते. या साठी प्रत्येक शवा साठी नातेवाईकांना दोन दोन हजार रुपये मोजावे लागतात. खरतर शासनाची ही सेवा नि:शुल्क असते तरीदेखील कोणीच या कडे लक्ष देत नाहीत. बेवारस मृतदेहांच्या शवविच्छेदन साठी पोलिसांना स्वत:च्या शिशातून या व्यक्तीला पैसे द्यावे लागतात. यालाच मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाने असेतर म्हणत नाहीत ना? शवविच्छेदन गृहात लाईट नाही व जुन्या बिटीश कायद्याचा आधार घेऊन संध्याकाळी ६ नंतर शवविच्छेदन केले जात नाही. अशा वेळी मृतदेह रात्रभर याच खोलीत ठेऊन नातेवाईकांना बाहेर पहारा देत बसावे लागते. बाहेर गावच्या मृतदेह असला की त्यांच्या नातेवाईकांचे पुरतेच हाल होतात.

मृत्यू नंतरही मृतदेहांच्या या यातना कधी संपणार आहेत? कोणालाच हे दिसत नाही का ? मग सगळेच मुग गिळून गप्प का आहेत? असा सवाल मृतांचे नातेवाईक करीत असतात. महाडच्या शवविच्छेदन गृहाबाबत पत्रकार सतत आवाज उठवत असतात, मात्र प्रशासनावर याचा परिणाम होत नाही. अखेर एवढेच म्हणावेसे वाटते की 'मृत्युनंतरच्या या नरक यातना थांबणार तरी कधी? ऐतिहासिक महाडसाठी हे भुषणाव नक्कीच नाही.

# ...म्हणून साजरा केला जातो जागतिक डास दिन

आज २० ऑगस्ट २०२४. दरवर्षी २० ऑगस्ट हा दिवस जागतिक डास दिन अर्थात वर्ल्ड मॉस्किटो डे म्हणून साजरा केला जातो. डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी जनजागृती करण्यासाठी जागतिक डास दिन साजरा केला जातो.

एक मच्छर आदमी को... बना देता है... हा क्रांतिवीर सिनेमातील नाना पाटेकर यांचा संवाद अतिशय प्रसिद्ध आहे. हाच डास अथवा मच्छर अनेक रोगांचा वाहक ठरलेला आहे. आजच्या घटकेला, माणसाच्या आरोग्याचा खरा शत्रू 'डास'च आहे. झिका, मलेरिया, डेंगी, हत्तीपायासारख्या आजारांचा वाहक असलेल्या डासांचे समूळ उच्चाटन शक्य नाही. मात्र, डासांपासून निर्माण होणाऱ्या रोगांचा सामना करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची औषधे आणि आरोग्यविषयक उपकरणांची बाजारपेठ निर्माण झाली आहे.

डॉ. रोनल्ड रॉस यांनी संक्रमित झालेली मादा डास चावल्यामुळे हिवताप होतो, याचा शोध लावला. हे निमित्त साधून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २० ऑगस्टला जागतिक डास दिवस साजरा करण्यात येतो. डासांपासून मलेरिया होतो, ही माहिती पुढे आल्यानंतर डासांपासून बचावाचे घरघुती उपाय सुरू झाले. शास्त्रीय संशोधनातून डास पळविण्यासाठी अगरबत्ती, मच्छरदाणी, डास प्रतिबंधक औषधांमध्ये कॉइल, लिक्विड, मलम यांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. कोट्यावधीची बाजारपेठ निर्माण होण्यास डास निमित्त ठरले. डासांमुळे डेंगी, हिवताप, चिकनगुन्या, झिका, हत्तीपाय यासारख्या आजाराला सामोरे जावे लागते. डासांच्या हजारो प्रजाती असल्या तरी ॲनॉफेलीस, क्युलेक्स आणि ईडिस या प्रजाती रोगांचा प्रसार करतात. दरवर्षी एकूण लोकसंख्येच्या २० टक्के लोकांना हिवताप, डेंगीसह इतर किटकजन्य आजाराचा धोका आहे. पूर्वी केवळ नागपूर विभागात दरवर्षी २५ लाख व्यक्तींच्या रक्ताची तपासणी होत असे. कुंडी, फ्रिज, एसीमागील ट्रे, पिंप व छतावरील पाणी, नारळ कवट्या आणि भंगार साहित्यात डासांची उत्पत्ती होते.

**डासांच्या जाती आणि होणारे रोग**

एडिस इजिप्ती - झिका, येलो फिवर, डेंगी. दिवसा चावतात.

ॲनॉफेलिस - हिवताप होतो. रात्री चावतात

क्युलेक्स-हत्तीपाय, अंडाशय वाढणे. चिखलात चावतात.

**इतिहास:** १८९७ मध्ये सर रोनाल्ड रॉसच्या 'अनोफिलीस डास मलेरियाचे परजीवी मानवांमध्ये संक्रमित करतात' या शोधाची आठवण म्हणून दरवर्षी २० ऑगस्ट रोजी जागतिक मच्छर दिन साजरा केला जातो. लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिन १९३०च्या दशकापासून ब्रिटीश डॉक्टरांच्या कार्याला सलाम करण्यासाठी वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. आकाराने अगदी लहान असले तरी, डास हे कदाचित एकमेव शिकारी आहेत जे शतकानुशतके भरभराटीला आले आहेत. खर तर, हे जगातील सर्वात घातक कीटक म्हणून गणले जातात. दरवर्षी सात लाखांहून अधिक लोकांचा बळी मच्छरामुळे होणाऱ्या आजारामुळे होतो.

## बदलते तंत्रज्ञान

# आयफोन १६ पाच कलर ऑप्शन्ससह येणार?

सध्या अनेक दिवसांपासून आयफोन १६ची बरीच चर्चा सुरू आहे, पण आयफोन १६ सिरीज कधी लाँच होईल याबाबत ॲपलने जास्त माहिती दिलेली नाही, पण कंपनीकडून लीक होणारी माहिती पाहून ग्राहकांमध्ये उत्सुकता वाढली आहे, असे म्हणायला हरकत नाही. प्रीमियम टेक ब्रँड गेल्यावर्षीप्रमाणे यंदाही सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात आपले नवीन आयफोन सादर करू शकेल, असंही सांगितलं जात आहे. तर तुम्हीदेखील आयफोन १६ खरेदी करण्याच्या तयारीत असाल, तर आयफोन १६ मध्ये कोणते रंग पर्याय असणार आहेत? कॅमेरा, डिस्प्ले, चिपसेट तसेच कोणते नवीन फीचर्स असणार आहेत, याबद्दल आपण आज सविस्तर जाणून घेऊया.



Reddit युजरने kaxeno5वर पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये आयफोन १६ काळा व पांढरा या दोन रांगांमध्ये दिसतो आहे. पोस्टमध्ये शेअर करण्यात आलेल्या आयफोनच्या फोटोमध्ये मागे असणारा कॅमेरा सेटअप हायलाइट करण्यात आला आहे, ज्यामध्ये तुम्हाला ड्युअल-कॅमेरा युनिट दिसेल. या नवीन डिझाईनमध्ये एका गोळीच्या आकाराचा कॅमेरा मॉड्यूलदेखील समाविष्ट आहे, जो आयफोन एक्सची आठवण करून देणारा आहे. हा तुम्हाला व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यास मदत करेल.

आयफोन १६मध्ये फ्लॅशची जागा बदलण्यात आली आहे तसेच आयफोन फक्त पांढऱ्या व काळ्या रंगाव्यतिरिक्त निळा, हिरवा, गुलाबी आदी रंगांमध्येदेखील असणार आहे. आयफोन १६मध्ये ६.१ इंचाचा OLED डिस्प्ले, ॲक्शन बटण, एक यूएसबी सी पोर्ट असणार आहे, हे फीचर सध्या फक्त आयफोन १५ प्रो मॉडेल्सवर दिसून येते, जे आता आयफोन १६मध्येसुद्धा दिसून येईल तसेच आयफोन १६ आणि आयफोन १६ प्लस TSMCच्या ३nm वर तयार केलेल्या A१८ बायोनिक चिप किंवा प्रोसेसरसुद्धा देईल.

आगामी सर्व आयफोन १६ सीरिजच्या मॉडेलमध्ये A१८ चिपसेट दिला जाऊ शकतो याची शक्यता जास्त आहे, कारण यामुळे आयफोन्स ऑफलाइन एआय टास्क करू शकतील, पण प्रो व्हेरिएंटपेक्षा आयफोन १६ आणि आयफोन १६ प्लसमधील प्रोसेसर वेगळा असू शकतो. आगामी आयफोन १६ सीरिजमध्ये रॅम बूस्ट फीचरचा समावेश केला जाऊ शकतो; तसेच जुन्या मॉडेलमधील ६जीबी रॅमऐवजी यंदा ८जीबी रॅम दिला जाऊ शकतो.

# विज्ञानवादी कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर

**निमित्त**



नरेंद्र अच्युत दाभोलकर हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना इ.स. १९८२ साली श्याम मानव यांनी स्थापन केली आहे, मात्र इ.स. १९८९ साली नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाची वेगळी संघटना सुरू केली. ते स्वत या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. नरेंद्र दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पूलावर अज्ञातांनी चार गोळ्या झाडून हत्या केली.

वडील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व आई ताराबाई यांच्या दहा अपत्यांपैकी नरेंद्र हे सर्वांत धाकटे होय. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी झाला. दाभोलकरांनी शैला यांच्याबरोबर विवाह केला. त्याना मुक्ता आणि हमीद ही अपत्ये आहेत. सामाजिक कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या नावावरून त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले. लग्नसोहळा व त्यामधील खर्च यावर ते सतत टीका करीत. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह साध्या पद्धतीने केले.

नरेंद्र दाभोलकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. बाबा आढाव यांच्या एक गाव एक पाणवठा या चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या इ.स. १९८२ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये कार्य सुरू केले, पण नंतर इ.स. १९८९ मध्ये त्यापासून वेगळे होऊन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर १९९८पासून मृत्यूपर्यंत संपादक होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी लोकप्रबोधन करण्यात येते. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे, यासाठी दाभोलकर गेल्या काही वर्षांपासून कार्यरत होते. नरेंद्र दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३मध्ये पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पूल येथे अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली. पुण्यामध्ये असताना ते रोज सकाळी घरापासून ते बालगंधर्व रंगमंदिरापर्यंत फिरायला जात असत.

२० ऑगस्ट रोजी घरून निघाल्यावर दाभोलकर पुलावर असताना सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्यावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी चार गोळ्या झाडल्या. एक गोळी त्यांच्या पाठीच्या बाजूला लागली, एक चुकीच्या दिशेने गेली. चार गोळ्यांपैकी दोन गोळ्या त्यांच्या डोक्याला लागल्यामुळे दाभोलकर घटनास्थळीच कोसळले. गोळीबार केल्यावर हल्लेखोर स्प्लेंडर दुचाकीवरून पळून गेले. हल्लेखोर २५ ते ३० वयोगटातील होते. हल्लेखोरांपैकी एकाने टोपी घातली होती आणि दुसऱ्याच्या पाठीवर बॅग होती. घटना घडल्यावर हल्लेखोर रविवार पेठेच्या दिशेने पळून गेल्याचे पोलिसांनी सांगितले. एका प्रत्यक्षदर्शीने ही घटना बघितल्यावर पोलिसांना त्याबद्दल माहिती दिली. पोलिसांनी दाभोलकरांना ससून रुग्णालयात हलविले. ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

**-साभार विकिपीडिया**

**क्लिक...क्लिक...!**



**पाली : सर्वत्र माळरान, डोंगर उतार व शेताच्या बांधावर आकर्षक तेरड्याची फुले फुलली आहेत. विविध आकर्षक रंगांची ही फुले सगळ्यांचेच लक्ष वेधत आहेत. गणपती बरोबर येणाऱ्या गौरी मातेला विशेषकरून ही फुले अर्पण केली जातात.**

## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यात पर्यटनाला जाताना सावधान! मलेरियाचा धोका

अनेक लोक पावसाळ्यात निसर्गरम्य ठिकाणी सहलीचे नियोजन करत आहेत. हिरवागार निसर्ग जणू आपल्याला त्याच्याकडे बोलावूनच घेतो, मात्र या काळात डासांचं प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढतं. मलेरियासारखे डास परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. यामुळे अतिरिक्त सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अशातच सुरक्षित आणि आनंददायी प्रवास करण्यासाठी मलेरियापासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी बंगळुरूच्या जनरल फिजिशियन एमबीबीएस, एमडी, डॉ. पल्लेटी शिव कार्तिक रेड्डी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



पावसाळ्यात फिरायला गेलंच पाहिजे, मात्र फिरायला गेल्यावर आपली काळजी घेणेही तितकंच महत्त्वाचं आहे. मलेरियाच्या वाढत्या धोक्याची जाणीव असणे महत्त्वाचे आहे. मलेरियाची लक्षणे जाणून घेणे आणि त्वरित वैद्यकीय मदत घेणे महत्त्वाचे आहे. मलेरियामध्ये सामान्यत: ताप खोकला, सर्दीसारखी लक्षणे दिसून येतात. मलेरियापासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे. ज्यामध्ये उपाय जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

मलेरियाविरोधी औषध : योग्य मलेरियाविरोधी औषध घेण्यासाठी तुमच्या सहलीच्या अगोदर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. ही औषधे संसर्ग होण्यापासून रोखण्याचे कार्य करतात. तुमच्या सहलीपूर्वी ते घेणे, सुरू करणे, तुमच्या मुक्कामादरम्यान ते सुरू ठेवणे आणि तुम्ही घरी परतल्यानंतरही त्याचा कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे.

डास चावण्यापासून बचाव : मलेरियापासून बचावाचा मुख्य उपाय म्हणजे जिथे डास आहेत त्या भागात संपर्क कमी करणे. मलेरियाचे डास पहाटे आणि संध्याकाळच्या वेळी सर्वाधिक सक्रिय असतात. यावेळी सुरक्षित ठिकाणी थांबलं पाहिजे. तसेच लांब हात असलेले कपडे आणि पँट घाला.

लोशन लावणे : डास चावण्यापासून बचाव करण्यासाठी हाताला आणि पायाला डीईईटी, पिकारिडिन क्रीम त्वचेच्या उघड्या भागावर लावा. ही क्रीम निवडतानाही डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.


घरात कीटकनाशक फवारणी : डासांची संख्या आणखी कमी करण्यासाठी घरामध्ये कीटकनाशके वापरा. संध्याकाळपूर्वी फवारणी करणे विशेषत: प्रभावी ठरू शकते. त्यामुळे मलेरिया होऊ नये म्हणून 'अशी' काळजी घ्या आणि ॲडमिट होण्याचा धोका टाळा.

# माथेरानला वाहतूक कोंडीचे दुष्टचक्र

**माथेरान : प्रतिनिधी**

पावसाळ्यात निसर्गाच्या सानिध्यात एक दोन दिवस थकवा दूर करण्यासाठी जवळचे पर्यटनस्थळ म्हणून माथेरानला पसंती देतात, परंतु येथील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने घाटरस्त्यात वाहतूक कोंडी होत असल्याने तासनतास पर्यटकांना मोटार गाडीतच अडकून राहावे लागत आहे. त्यातच पावसाळ्यात हा केवळ सात किलोमीटरचा फक्त वीस मिनिटांचा प्रवास वाहतूक कोंडीमुळे वेळप्रसंगी दिड ते दोन तासाचा बनला आहे. त्यामुळे या मार्गावर प्रशासन या वाहतूक कोंडीचे दुष्टचक्र केव्हा दूर करणार या विवंचनेत पर्यटक दिसत आहेत.

निसर्ग सौंदर्याने नटलेल्या माथेरान मध्ये सद्यस्थितीत दस्तुरी नाक्यापासून ते माथेरान रेल्वे स्टेशनपर्यंत ई–रिक्षाची महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध झाल्यामुळे खऱ्या अर्थाने पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसत असल्याचे नाकारताच येत नाही. अनेक वर्षांपासून दस्तुरी पार्किंग येथील एमपी ९३ हा प्लॉट रिक्त असून तो अद्यापही नगरपरिषदेच्या अखत्यारीत आलेला



नाही. हा प्लॉट उपलब्ध होण्यासाठी खऱ्या अर्थाने तालुक्यातील, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करून पार्किंगसाठी उपलब्ध करून दिल्यास पार्किंगची समस्या कायम स्वरूपी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे घाटरस्त्यातील वाहतूक कोंडी आपसूकच दूर होणार आहे. याकामी स्थानिक पातळीवरील व तालुक्यातील राजकीय श्रेयवाद बाजूला सारून एकोप्याने हा प्रश्न मार्गी लागू शकतो, असे स्थानिक बोलत आहेत.

काही दिवसांपूर्वी पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर माथेरान येथे आले असताना त्यांनादेखील भारतीय जनता पक्षाच्या वतीने पार्किंग समस्येबाबत निवेदन देण्यात आले. ही समस्यादेखील आपण लवकरच मार्गी लावू असे त्यांनी त्यावेळी सांगितले.

> **आम्ही आजवर अनेक ठिकाणी पाहिले आहे की पर्यटनस्थळावर जाण्यासाठी अन्य पर्यायी व्यवस्था असते, परंतु माथेरानमध्ये येण्यासाठी नेरळ ते माथेरान हाच मार्ग असल्याने या घाटात सुट्ट्यांच्या हंगामात खूपच गर्दी होते.सुट्टीच्या एकाच दिवशी मुंबईचे लोक फिरायला निघतात, पण सर्वानाच इथे होणाऱ्या ट्रॅफिक मुळे जिकरीचे बनले आहे. सरकारने इथे सुध्दा काहीतरी पर्यायी व्यवस्था केली पाहिजे.**
> **–यशवंत कोळी, पर्यटक, मुंबई**

# अलिबागच्या सीसीटीव्ही सर्व्हेलेंस यंत्रणेच्या चौकशीसाठी समिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या सीसीटीव्ही सर्व्हेलेंस यंत्रणा उभारणी कामातील कथित गैरव्यवहार प्रकरणी आता शासनाच्या निदेशानुसार रायगड जिल्हा प्रशासनाने चौकशी समिती नियुक्त केली आहे. येत्या २१ ऑगस्ट रोजी या समितीसमोर सुनावणी घेण्यात येणार आहे. अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी याबाबत तक्रार केली होती.

सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असून कार्यकारी अभियंता विदयुत, सार्वजनिक बांधकाम विभाग, पेण, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती रायगड, लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन अधिकारी हे या समितीचे सदस्य आहेत.

अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत संजय सावंत यांनी तक्रसर केली होती.

## उद्या होणार सुनावणी

मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांचे विरूध्द फौजदारी केस दाखल करण्यासाठी सीआरपीसी कलम १९७ खाली अ‍ॅड.अजय उपाध्ये यांच्यामार्फत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे विनंती अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने शासनाने जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे मुख्याधिकारी यांच्या कथित गैरव्यवहाराबाबत अहवाल मागविला होता. शासनाने जिल्हाधिकारी यांना लिहीलेल्या पत्राची प्रत सावंत यांना शासनाकडून प्राप्त झाली होती.

अलिबाग शहरात कायदा व सुव्यवस्था व सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही सर्व्हेलेंस यंत्रणा उभारण्यासाठी तीन कोटी १० लाख रूपये खर्चाचा प्रकल्प आहे. यात एका ठिकाणच्या सीसीटीव्हीसाठी सुमारे दहा लाख रूपये इतका खर्च आला असल्याने अलिबाग नगर परिषदेच्या प्रशासकांच्या मनमानी कारभाराबाबत येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी शासनाकडे तक्रार केली होती. ठेकेदाराने जे दर लावले आहे ते अतिशय महाग असून ३२ कॅमेऱ्यांसाठी प्रत्येकी सरासरी सुमारे दहा लाख रूपये खर्च होणार आहेत ते बाजारभावाच्या वीसपट असल्याची तक्रार सावंत यांनी केली होती.

कोकणातीलच पालघर नगरपरिषदेमध्ये ६० कॅमेरे ८० लाख रूपयांत उभे राहतात तर अलिबागमध्ये ३२ कॅमेऱ्यासाठी तीन कोटी नऊ लाख इतका खर्च का? असा सवाल यांनी उपस्थित केला होता. सीसीटीव्हीचे दर अव्वाच्या सव्वा असल्याने तसेच या टेंडरमुळे शासनाचे दोन कोटी रुपये अतिरिक्त खर्च होत असल्याने त्याचे टेंडर तात्काळ रद्द करण्यात येवून नव्याने निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी, अशी मागणी संजय सावंत यांनी अलिबाग नगर परिषद, जिल्हा पोलीस अधिक्षक तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती.



**अलिबाग : भाजप चौल वतीने वॉड नं.३ मध्ये रक्षाबंधना निमित्ताने माता भगिनींना साड्यावाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम संकेत जोशी यांनी आयोजित असून कार्यक्रमाची सुरुवात भाजप दक्षिण रायगड कोषाध्यक्ष हेमंत दांडेकर यांच्या हस्ते झाली. या वेळी चंपावती पतसंस्था अध्यक्ष विश्वास जोशी, दिलीप पराड आदी उपस्थित होते. कार्यक्रम समीर नाईक, रवींद्र राऊत, शुभांगी घरत, तेजश्री वर्तक यांच्या सहकार्याने झाला.**

# आदिवासी मुलांनी बांधल्या झाडांना राख्या

**पेण : प्रतिनिधी**

राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. राखी बांधण्याच्या या सणातून स्नेह व परस्परप्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. अंकुरच्या मुलांनी या स्नेहरूप बंधनाचा प्रतीकात्मक रूपाने निसर्गाची बांधिलकी कृतीतून स्विकारली असून जागतिक तापमानवाढीच्या बाबतीत जनजागरण व्हावे या उद्देशातून त्यांनी परिसरातील झाडांना राख्या बांधल्या.

सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील संस्थापक असलेल्या अंकुर ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेत एकुण ७० कातकरी व स्थलांतरित मजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. आज या आगळ्या–वेगळ्या कार्यक्रमात नसरीन मनियार, दिपाली व संदीप फडणीस, विलास पाटील व संस्थेचे विश्वस्त ए.राज



उपस्थित होते. या वेळेस आदिवासी बालकांनी उपस्थित महिलाांना तसेच झाडांना राख्या बांधून पर्यावरणपुरक रक्षाबंधनास सुरूवात केली.

आदिवासी बालकांना अंकुरच्या कार्यकर्त्या श्रुती तिमाने यांनी इको फ्रेंडली राख्या बनवायला शिकवल्या. या वेळेसफडणीस मॅडमने मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले तर श्रीमती नसरीन मनियार यांनी मिठाई वाटप केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिवासी विद्यार्थीनी चैताली आखाडे हिने केले तर आभार प्रदर्शन स्नेहल जाधव हिने केले. या कार्यक्रमासाठी लंकेश गवस व किर्ती सुर्वे यांनी परिश्रम घेतले.



**रोहा : तालुक्यात रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याच अनुषंगाने घरेलु कामगार संघ रायगडच्या वतीने येथील पोलीस ठाण्यात रक्षाबंधनाचा कार्यक्रम करण्यात आला. या वेळी पोलीस कर्मचारी व घरेलु कामगार उपस्थित होते.**

# फुडमॉल येथून पर्स चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील चहा पिण्यासाठी थांबलेल्या सायली विनोद भडंग (वय ३१, रा. ठाणे) यांची पर्स अज्ञात चोरट्याने हातोहात लंपास केल्याची घटना घडली आहे.

सायली रविवारी मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरून प्रवास करीत असताना सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास खालापूर हद्दीतील फूड मॉल येथे चहा पिण्यासाठी थांबल्या होत्या. सायली यांनी त्यांची पर्स टेबलवर ठेवली होती. पर्समध्ये चार हजार रुपये रोख रक्कम, पाच हजार रुपये किंमतीची चांदीची साखळी, डेबिट कार्ड, आधार कार्ड आणि त्यांच्या घराच्या चाव्या होत्या.

चोरट्यांनी संधी साधून टेबलवरची पर्स चोरून नेली. सायली आणि अज्ञात चोरट्याविरुद्ध खोपोली पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दिली असून पुढील तपास सुरू आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई–निविदा सूचना क्र. १६ सन २०२४–२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | रामराज महान रस्ता प्रजिमा– ३१ कि.मी. २/०० ते ३/०० मध्ये मजबूतीकरण व डांबरीकरण करणे ता. अलिबाग जि. रायगड | ४७,९९,८६५.०० |
| २. | शिघ्रे गावठाण जोड रस्ता तयार करणे ग्रामा– ९ कि.मी. ०/०० ते ०/४०० व मोऱ्यांची दुरुस्ती करणे कि.मी. ०/१५०,०/२००,०/२९०,०/३०० ता. मुरुड जि. रागयड | १५,४०,१२२.०० |
| ३. | उसरोली आदाड वडघर रस्ता ग्रामा– ११३ कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबूतीकरण व डांबरीकरण करणे ता. मुरुड, जि. रायगड | ८४,४२,८१३.०० |
| ४. | चिवे तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे ता. सुधागड, जि. रागयड | २७,०१,५९७.०० |
| ५. | नवघर तलाठी कार्यालयाचे बांधकाम करणे ता. सुधागड, जि. रागयड़ | ५१,१३,८२९.०० |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक २०.०८.२०२४ (स.१०.०० ) ते दिनांक २७.०८.२०१४ (सं.१८.००)
**ई–निविदा उघडणे** : दिनांक ३०.०८.२०२४ (दु. ३.०० वा. )
(कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई– निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ४२१४/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग – ४०२ २०१
दिनांक :– ०८/०८/२०२४

**सही/–**
**(ज. ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक २४/२०२४-२०२५ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रानसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रानसाई पाणीपुरवठा योजनेच्या बॅकवॉश टाक्यांना कंपन मॉनिटरिंग सिस्टम व लेव्हल इंडिकेटरचा पुरवठा करणे. | ₹ ३९,०८,४४०.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा येथील जलशुद्धीकरण केंद्र पासून ईएसआरपर्यंतची विद्यमान ३०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी शुध्द जलवाहिनी, ४०० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करून बदलणे. | ₹ ३९,००,०४६.०० |
| ३ | रानसाई पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....रानसाई येथील जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेडच्या हेड मापनासाठी वापरल्या जाणाऱ्या ऑनलाइन मायक्रोप्रोसेसरवर आधारित डिजिटल वायरलेस लेव्हल मॉनिटरिंग सिस्टमचा पुरवठा करून बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ २२,६२,६६०.०० |
| ४ | सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील कोरड्या विहिरीला संरक्षणात्मक प्रक्रिया करून मजबुतीकरण करणे . | ₹ ४०,१३,८४९.०० |
| ५ | अलिबाग रिजन व नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....पोयनाड व नागोठणे येथील वॉटर वर्क्सकरीता द्रवरूप क्लोरीन गॅसचा पुरवठा करणे. | ₹ २०,१९,०००.०० |
| ६ | अलिबाग रिजन व नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अलिबाग रिजन व नागोठणे औद्योगिक क्षेत्रातील पाणी देयके, बिलिंग सॉफ्टवेअर वापरून तयार करणे, केंद्रीय डेटा संकलन करणेकरीता मीटर रीडिंग व डेटा डिजिटलायझेशन करण्याची सेवा पुरविणे. | ₹ ११,९८,३३४.०० |
| ७ | अलिबाग रिजन व नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अलिबाग रिजन व नागोठणे येथे युपीएस व इन्वर्टर प्रणालीचा पुरवठा करून चाचणी घेणे व कार्यान्वित करणे. | ₹ ७,४५,७२४.०० |
| ८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूमिगत सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती......तळोजा औद्योगिक क्षेत्रातील फेज २ मधील टाकी पासून सामाईक सांडपाणी प्रक्रीया केंद्रापर्यंतच्या ६३० मि.मी. व्यासाच्या सांडपाणी संकलन पंपिंग वाहिनीकरीता एसएस -३१६ एअर व्हॉल्व्हचा पुरवठा करून बसविणे. | ₹ ३९,८४,७२२.०० |
| ९ | पाताळगंगा पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... सार्वजनिक बांधकाम विभागाचे गेस्ट हाऊस (साखळी क्र. २४.००० कि.मी.) ते नावडे (साखळी क्र. ३१.००० कि.मी.) पर्यंतच्या ७०० मि.मी. व्यासाच्या व ६७५ मि.मी. व्यासाच्या सिआय जलवाहिनीची दैनंदिन देखभाल करणे. | ₹ १३,०६,२५९.०० |
| १० | पेण अलिबाग रिजन पाणी पुरवठा योजना.. जलशुद्धिकरण केंद्रातील फिल्टर बेड्सचे परिचालन करण्यासाठी इंटर-कॉम्पॅटिबिलिटी पुरविणे. | ₹ ३९,९२,०४०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०८/२०२४ ते दिनांक २७/०८/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २२/०८/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २३/०८/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक



देशभरात रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानांना परिसरातील शालेय विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या.

### देशी वृक्षांची लागवड

**नवी मुंबई :** नेरूळमधील सामाजिक संस्था असलेल्या क्रिएटिव्ह फाऊंडेशनतर्फे नेरुलमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. सेक्टर १० नेरूळ येथील अण्णासाहेब पाटील



उद्यानात हे वृक्षारोपण पार पडले. क्रिएटिव फाउंडेशन नवी मुंबई अध्यक्ष पृथ्वी अरुण नलवाडे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. नवी मुंबई पालिकेने केलेल्या आवाहनानुसार या वेळी देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यात वड , पिंपळ, आंबा, कडुनिंब अशा देशी व  औषधी तसेच भरपूर ऑक्सिजन देणारी रोपे लावण्यात आली. पुढील तीन वर्षे या रोपांची काळजी घेतली जाणार आहे. या वेळी ज्येष्ठ नागरिक रंजना पुरारकर, रामचंद्र कांबळे, चंद्रकांत जाधव मिथिलेश गुप्ता आणि तसेच क्रिएटिव फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य् अध्यक्ष संदीप निकम, सचिव स्वप्नील गरुड, उपसचिव विपिन सिंग, कार्याध्यक्ष अनिल निकम आणि सदस्य उपस्थित होते.



**पनवेल : स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी महात्मा फुले एएससी कॉलेज पनवेल यांचे प्राचार्य गणेश ठाकूर यांची भेट घेतली व विद्यार्थ्यांना कॉलेज प्रवेशावेळी येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा केली.**

# ऑनलाईन गुंतवणूक महागात

## खारघरमध्ये बिल्डरची १३.५८ कोटींची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणुकीवर चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर टोळीने खारघरमध्ये राहणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाकडून तबल १३.५८ कोटी रुपये उकळून त्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. नवी मुंबई सायबर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात सायबर टोळीविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले ६० वर्षीय बांधकाम व्यावसायिक खारघरमध्ये राहण्यास असून जानेवारी महिन्यात सायबर टोळीने इलाना शर्मा या नावाने त्यांना संपर्क साधला होता. तसेच शेअर मार्केटमधून ते चांगला नफा मिळवू शकत असल्याचे त्यांना आमिष दाखवले होते. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतल्यानंतर सायबर टोळीने त्यांना एक लिंक पाठवून कंट्री



ग्लोबल गोल्ड कॅपीटल या कंपनीमार्फत शेअर मार्केटमध्ये ट्रेडींग करण्यास सांगितले. त्यानुसार बांधकाम व्यावसायिकाने लिंकद्वारे कंपनीचे वेबसाईट सुरू करून त्यात पैसे गुंतवण्यास सुरुवात केली. त्यानंतर सायबर टोळीने प्रज्ञा बंग नावाची महिला असल्याचे भासवून तक्रारदाराला संपर्क साधून तिच्या कंपनीमार्फतदेखील शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास त्यांना भाग पाडले. त्यानंतर बांधकाम व्यावसायिकाने या कंपनीत देखील गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. त्यानंतर एका कंपनीमध्ये त्यांना २.०५ कोटी रुपये आणि दुसऱ्या कंपनीमध्ये १.९० कोटी रुपये फायदा झाल्याचे दाखवण्यात आले. त्यामुळे या बांधकाम व्यावसायिकाने सदरचे पैसे काढून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना विविध कर भरण्यास सांगण्यात आले.

त्यानुसार या बांधकाम व्यावसायिकाने गुंतवणूक केलेली रक्कम आणि त्यावर झालेल्या फायद्याचे पैसे काढुन घेण्यासाठी सायबर टोळीने सांगितल्यानुसार तब्बल १३.५८ कोटी रुपये वेगवेगळ्या बँक खात्यावर पाठवून दिले, मात्र त्यानंतरदेखील त्यांना पैसे काढता आले नाहीत. अखेर आपली फसवणुक होत असल्याचे बांधकाम व्यावसायिकाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# एटीएममधील पैशांवर चोरांचा डल्ला

**पनवेल : वार्ताहर**



एटीएम मशिनमध्ये पैसे काढण्यासाठी आलेल्या व्यक्तीचे २३,८०० रुपये चोरल्याचा प्रकार खांदा वसाहतमध्ये घडला आहे. खांदा वसाहतीमध्ये अभ्युदय बँकेची एटीएम मशिन आहे.

या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे पैसे चोरण्यासाठी एका चोरट्याने एटीएम मशिनच्या कॅश डिस्पेन्सर पत्र्याच्या जागी दुसरा पत्रा लावून ठेवला होता. त्यामुळे एखाद्याने एटीएममधून पैसे काढल्यास ते पैसे चोरट्याने लावलेल्या पत्र्यामध्ये जावून अडकत होते. त्यामुळे पैसे काढणारा एटीएम मशिनमध्ये बिघाड झाल्याचे समजून निघून जात होते. त्यानंतर हा चोरटा एटीएम मशिनच्या कॅश डिस्पेन्सर पत्र्यात अडकलेले पैसे काढून घेत होता. याबाबतच्या तक्रारी तसेच एटीएममधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली असता अशा प्रकारचा प्रकार उघडकीस आला असून आतापर्यंत या चोरट्याने ग्राहकांचे २३ हजार ८०० रुपये चोरल्याचे निष्पन्न झाले आहेत व याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माजी आमदार संदीप नाईक यांचा एपीएमसीमधील नागरिकांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी आमदार संदीप नाईक यांनी आज कृषी उत्पन्न बाजार समितीमधील भाजीपाला आणि फळ मार्केटला भेट दिली. या वेळी येथील व्यापाऱ्यांसह अन्य घटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांचे स्वागत केले.



देशामधील सर्वात मोठी एपीएमसी नवी मुंबई येथे आहे. येथील व्यापारी, माथाडी, शेतकरी व अन्य सर्व घटकांबरोबर माजी आमदार संदीप नाईक यांनी संवाद साधला. वर्षानुवर्ष बाजार समितीमध्ये सेवा देणाऱ्या घटकांचा सन्मान देखील केला. दोन्ही मार्केटमध्ये माजी आमदार संदीप नाईक यांचे उत्साही स्वागत करण्यात आले.

बाजार समितीमध्ये भेडसावणाऱ्या अस्वच्छता, सुविधांचा अभाव, प्रशासकीय दिरंगाई इत्यादी समस्या व्यापाऱ्यांनी त्यांना अवगत करून दिल्या. या संदर्भात लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या माध्यमातून शासन स्तरावर लवकरात लवकर बैठक लावून या समस्यांची सोडवणूक करण्यात येईल, अशी ग्वाही माजी आमदार संदीप नाईक यांनी दिली. एपीएमसीमधील नागरिक संवाद प्रसंगी माजी नगरसेवक प्रकाश मोरे, विजय वाळुंज, शंकर पिंगळे, संजय पानसरे आदी उपस्थित होते.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे 'बालग्राम'मध्ये रक्षाबंधन

## महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या (स्वायत्त) मधील इतिहास विभागाच्या वतीने रक्षाबंधन ह्या सणाचे औचित्य साधून बहिशाल उपक्रमांतर्गत शनिवारी (दि.१७) बालग्राम महाराष्ट्र, पंचदीप संकुल, खांदा कॉलनी, पनवेल येथे भेट देऊन तेथील मुलांसमवेत रक्षाबंधन हा सण उत्साहात साजरा केला.

या वेळी इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी बालग्राम महाराष्ट्र या सेवाभावी संस्थेची माहिती देऊन मीनल टिपणीस यांच्या अध्यक्षतेखाली या संस्थेचे कार्य कसे चालते याची माहिती देवून संस्थेचे अधिक्षक डॉ. विनायक पाटील यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तसेच महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला शाखा इतिहास विभागाच्या विद्यार्थीनींनी येथील मुलांना राख्या बांधल्या व बालग्राम मधील मुलींनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला व या मुलांना शालोपयोगी वस्तू



आणि खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी बालग्राम महाराष्ट्र संस्थेच्या सदस्या पूनम पाटील, आरती यादव आणि इतिहास विभागाचे ७२ विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे, प्रा.भावेश भोईर आणि इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले.

# उलवेमध्ये आरोग्य केंद्र सुरू करण्याची मागणी



**उरण : बातमीदार**

उलवे नोडमध्ये नागरी आरोग्य केंद्र चालु करण्यात यावे व खासगी रुग्णालयाकडुन होणारी नागरिकांची आर्थिक लूट थांबावी म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उलवे शहर अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील व पनवेल तालुका उपाध्यक्ष निर्दोष केशव गोंधळी यांनी काही दिवसापूर्वी सिडको अधिकारी डॉ बाविस्कर व पनवेल आरोग्य केंद्र यांना निवेदन दिले होते. त्या अनुषंगाने पनवेल आरोग्य केंद्राचे अधिकीरी सुनील नखाते यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा करण्यात आली व लवकरात लवकर उलवे नोडमध्ये आरोग्य केंद्र (हॉस्पीटल) चालू करण्यात यावे, असे स्मरणपत्र देण्यात आले.

मनसे उलवे नोड गव्हाण विभागातील पदाधिकाऱ्यांकडून या मागणीचा सातत्याने पाठपुरावा चालु आहे. स्मरणपत्र देतेवेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उलवे शहर अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील, पनवेल तालुका उपाध्यक्ष निर्दोष केशव गोंधळी, उलवे गाव शाखा उपाध्यक्ष संदीप म्हात्रे व ॲड. शुभम मढवी उपस्थित होते.

## सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०२४

# सर्वोत्कृष्ट मंडळासाठी पाच लाखांचे पहिले पारितोषिक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत दिनांक ७ सप्टेंबर २०२४ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी शासनाकडून सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी पाच लाख रुपयांचे पहिले पारितोषिक देण्यात येणार आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी. पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ईमेलवर दि.३१ ऑगस्ट २०२४ पूर्वी ऑनलाईन अर्ज करावेत, अशी माहिती पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे संचालक यांनी दिली आहे.

लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव आयोजित करण्याची प्रथा सुरु केली. महाराष्ट्र शासनातर्फे सार्वजनिक गणेशोत्सवात जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, याकरिता सन २०२३ मध्ये राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात आले होते. त्याच धर्तीवर ७ सप्टेंबर



२०२४ पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय शासनाने ३१ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेतला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२४ अंतर्गत मुंबई, मुंबई (उपनगर), पुणे, ठाणे या जिल्ह्यांतून प्रत्येकी तीन व अन्य जिल्ह्यांतून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यात येणार असून, त्यातून राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्स मंडळास रुपये पाच लाख, द्वितीय क्रमांक रुपये दोन लाख ५० हजार व तृतीय क्रमांक रुपये एक लाख इतक्या रकमेचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तर उर्वरित ४१ जिल्हास्तरीय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना सहभागी होता येईल. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावरील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ३१ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाच्या सोबत स्पर्धा निवडीचे निकष आणि अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

अर्जाच्या नमुन्यानुसार स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्स मंडळांनी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई-मेलवर १ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत अर्ज सादर करावा. स्पर्धेत जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

# जलवाहिन्यांवरील बूस्टरपंप हटविण्याचे आवाहन

**पनवेल :** अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे गृहनिर्माण संस्थांनी जलवाहिनीवर पाणी खेचण्यासाठी बूस्टरपंप बसवले. त्यामुळे ज्या गृहनिर्माण संस्थांनी बूस्टरपंप बसवले नाही त्यांना थेंबरसुद्धा पाणीपुरवठा होत नसल्याने लाखो रुपये खर्च करुन या गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरने पाणी खरेदी करावे लागते. बेकायदा बूस्टरपंपवर नियंत्रणासाठी सिडको मंडळाने खास मोहीम हाती घेऊन खारघर वसाहतीमधील सेक्टर ३४, ३५ येथील गृहनिर्माण सोसायट्यांनी लावलेली बूस्टरपंर हटवले.

खारघरप्रमाणे कळंबोली, कामोठे, पनवेल, करंजाडे, द्रोणागिरी या नोडमध्ये ही कारवाई केली जाईल अशी माहिती सिडको मंडळाच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली आहे. सिडकोने गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना स्वताहून बूस्टरपंप हटविण्याचे आवाहन केले आहे.

सिडकोच्या शोध मोहीमेमध्ये बूस्टरपंप गृहनिर्माण सोसायटीने लावल्याचे आढळल्यास संधित गृहनिर्माण सोसायटीवर कायदेशीर कारवाई करु असा इशारा सिडकोच्या जनसंपर्क विभागाने दिला आहे.

# फुंडे विद्यालयात वृक्षबंधन कार्यक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

श्रावण महिन्यातील सर्वात मोठा सण आणि बहीण भावाच्या प्रेमळ नात्याचे प्रतीक असलेला उत्सव म्हणजे रक्षाबंधन होय. फुंडे हायस्कुल येथे शनिवारी (दि.१७) रक्षाबंधन व वृक्षबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. इयत्ता आठवी अ च्या वर्गाने त्यांच्या वर्ग शिक्षिका संगीता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते. विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे, स्थानिक स्कुल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, साधना पाटील, एच. एन. पाटील आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज आहे. ही बांधिलकी जोपासत शालेय परिसरातील झाडांना राख्या बांधून त्यांचे संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांना समाजवण्यात आली व वृक्षांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आठवीच्या विद्यार्थ्यांनी झाडांना बांधण्यासाठी खूप सुंदर, आकर्षक राख्या तयार केल्या होत्या. या कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन श्रेया पाटील हिने केले. यानंतर प्रत्येक वर्गात वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर विद्यालयात जादूचे  प्रयोग दाखविण्यात आले. जादूगार डॉ आनंद यांनी जादूचे विविध प्रयोग दाखवून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. कलाशिक्षक रमेश खुटारकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्राचार्य एम.जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही.के. कुटे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या राख्यांची विक्रीसुद्धा करण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून राख्यांची खरेदी करून त्यांना स्वकमाईचा आनंद मिळवून दिला.

# ब्राह्मण सभेची वार्षिक सर्वसाधारण सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेची १७वी वार्षिक सर्वसाधारण सभा खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात झाली.

दिपाली जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन झाल्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभेला सुरुवात झाली. सभेचा अहवाल आणि इतर मुद्दे यावर चर्चा करून प्रस्ताव मंजूर करण्यात आले. अध्यक्ष दीपाली जोशी यानी सभेला मार्गदर्शन केले आणि आभार मानून सभेची सांगता केली.

या वेळी नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.अध्यक्ष दिपाली जोशी, उपाध्यक्ष चंद्रकांत ताम्हनकर, सचिव विनया वाळिंबे, प्रभारी सचिव मिलिंद गांगल सहसचिव मंजुषा भावे खजिनदार वैशाली सरदेशपांडे, सह खजिनदार स्नेहा कुळकर्णी आणि अर्चना केळकर, प्रशांत सदावर्ते, दीपक कुलकर्णी, शामनाथ पुंडे, मिलिंद मोघे आणि शेखर अंबेकर या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. नंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा वाचनीय पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात सभासद कलाकारांनी सदाबहार गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. चंद्रकांत ताम्हनकर यांनी सभेचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.




## पाऊसरंग

निळ्या निळ्या अंबराचे
आकाश धरे छत्र शिरी
पळापळ पाहता ढगांची
मोद दाटुनी येत असे उरी

धरेवर पसरले हिरवे गालिचे
तरारून आली यौवनात सृष्टी
आली नवी लकाकी तरुवेलिवर
होता मृग नक्षत्रांची वृष्टी

शेतकऱ्याच्या मनाही फुटले
सुख समृद्धीचे स्वप्न धुमारे
राब राब राबूनी शेतात त्या
कष्ट विसरुनी जाय सारे

करूनी भूमंडळावर सारी
रंगाची मुक्तहस्ते उधळण
सांगुनी देण्याचा धर्म निसर्ग
मानवाच्या मना लावे सुवळण



सायराबानू चौगुले,
(माणगाव, रायगड)

## निवडक



### पळसदरी येथे विविध कार्यक्रम

**कर्जत** : पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठाचे संस्थापक मठाधिपती गुरुवर्य स्व. दादा दरेकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मठाच्या वतीने जिल्हा परिषद शाळा पळसदरी ठाकूरवाडी येथील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप तसेच सर्व स्वामी भक्तांसाठी कलमी आंब्यांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. आजच्या या दिनी मठाच्या उभारणीपासून आजपर्यंत स्वामींच्या अनेक लिलांची महती सांगणाऱ्या यू-ट्युब चॅनलवरील लघुपटाच्या प्रक्षेपणाचे उद्घाटन रघुनाथ निगुडकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला विक्रांत दरेकर, अभिजीत दरेकर, बंधु प्रकाश दरेकर, माधवी दरेकर, मोनाली दरेकर, जुई दरेकर, वकील प्रदीप सुर्वे, राजू पोतदार, रघुनाथ निगुडकर, नरेंद्र दरेकर, महेंद्र निगुडकर, विठ्ठल सुर्वे, महेंद्र शिंदे, दत्तात्रेय दरेकर, सदानंद लोखंडे, अशोक शितोळे, जयेश जाधव, प्रभाकर करंजकर, वत्सला वांजळे, सचिन दरेकर, जीवन थोरवे, रितेश मांडे, अतुल सावंत, भानूदास शिंदे, नारायण दरेकर, विजय दरेकर उपस्थित होते.

### डिकसळ येथे वर्षावासनिमित्त बालसंस्कार



**कर्जत** : डिकसळ शांतीनगर येथे वर्षावासनिमित्त बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. सहा दिवसांच्या या शिबिरात मोठ्या प्रमाणावर लहान बालके यांचा शिबिरात सहभाग होता. शिबिरात बौद्ध धम्माचे ज्ञान देण्यात आले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची ओळख करून दिली, तसेच पंचशील आचरण कसे करावे लागते तसेच आणापाना विपश्यना साधना याची माहिती दिली. सलग सहा दिवस चाललेल्या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून वैशाली बोखारे, तनुजा गायकवाड, मृणाली गायकवाड, हिराबाई हिरे, रेखा गायकवाड, उपासक सुनील जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी मुलांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करून शिबिराचा सांगता समारोप झाला.

### महसूल सहाय्यक तुषार सुर्वे यांचा गौरव

**माणगाव** : तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक तुषार सुर्वे यांचा कार्यालयातील उल्लेखनीय कामकाजाबाबत महसूल पंधरवड्याचे औचित्य साधून उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) संदीपान सानप यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला. तुषार सुर्वे यांनी २०२३-२४ या महसूल वर्षांमध्ये कार्यालयात उल्लेखनीय कामकाज केले आहे. या व्यतिरिक्त तहसील कार्यालयात विविध कामानिमित्त येणाऱ्या जनतेला ते विशेष असे सहकार्य करीत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमास तहसीलदार दशरथ काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, मुख्याधिकारी संतोष माळी आदी उपस्थित होते. त्यांच्या करण्यात आलेल्या या गौरवाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# रोहा शहरात स्वच्छतेविषयी उदासीनता



## अनेक ठिकाणी कचरा जैसे थे; परिसरात दुर्गंधी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिकेकडून कचरा उचलण्यासाठी कंत्राट देण्यात आले आहे. शहरात कचरागाडी संगीत ऐकवित कचरा नेण्यासाठी येत आहे. तरीही काही ठिकाणी कचरा बेदरकारपणे फेकलेल्या अवस्थेत इतरस्त्र पसरलेला आहे. त्यावर कुत्री, गुरे कचरा सर्वत्र पसरवितात असे चित्र आहे. त्यामुळे रोहेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

'येथे कचरा करू नये' असा संदेश छापलेले बॅनर ज्या ठिकाणी लावण्यात आले आहेत नेमके त्याच ठिकाणी प्लास्टिक पिशव्यामिश्रीत पसरलेला कचरा आणि त्यातून येत असलेल्या दुर्गंधीतून नाक मुठीत धरून वाट काढावी लागते आहे.

रोहा न.पा.च्या मुख्य रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या समोर, सरकारी रुग्णायांजवळ, मेहेंदळे हायस्कूल समोर, नाना शंकशेठ मार्गावर असा पसरलेला कचरा अनेकदा पहायला मिळतो. सध्या पावसाचे दिवस असल्याने हा कचरा कुजून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी भटकी कुत्री, जनावरेही हा कचरा इतरत्र पसरवत आहेत. त्यामुळे रोहेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**रोहा शहरात काही ठिकाणी कायम असा कचरा पडलेला असतो. प्लास्टिक कचरा आणि भाजी कचरा डंम्प करण्यासाठी प्रशासनाने योजना सुरू केली आहे असे वाटते. पादचाऱ्यांना येथून नाक मुठीत धरून चालावे लागते.**
**-दिलीप वडके, ज्येष्ठ पत्रकार**

**पालिकेच्या गोटात स्वच्छतेविषयी कायम उदासीनता दिसून येते. पूर्वीच्या काळी अशाप्रकारे कचरा करण्याची प्रवृत्ती रोहा शहरात नव्हती, प्रत्येकजण आपापल्या परिसरात स्वच्छता ठेवत असत. अलिकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.**
**-नितीन परब, अध्यक्ष, रोहा सिटीझन फोरम**

**नगरपालिकेने वारंवार सांगूनदेखील या ठिकाणी कचरा टाकण्याचे प्रकार घडत आहेत. तेथील कचरा आता उचलण्यात आले आहे. वारंवार कचरा टाकण्याच्या समस्येवर या ठिकाणी नगर परिषदेमार्फत सौंदर्यीकरण करून या प्रश्नावर कायस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहे**
**-पंकज भुसे, मुख्याधिकारी, रोहा न.पा.**

## मुरूडमधील तेलवडे टक्का आदिवासीवाडीला घरकूल वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने तेलवडे टक्का आदिवासीवाडी येथे जनमन व आदिम योजनेतून ३४ घरकुले मंजूर झाली होती. त्यापैकी १२ घरकुले पूर्ण झाल्याने त्या घराच्या चाव्या आदिवासी लोकांना सुपूर्द करण्यात आल्या.

या विशेष कार्यक्रमासाठी शिवसेना नेते विघ्नेश माळी उपस्थित होते. घराच्या चाव्या मिळाल्याने आदिवासी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते. झोपडीत राहणाऱ्या आदिवासी समाजाला स्वतःचे घर मिळाले आहे. कार्यक्रमासाठी तालुका संघटक दिनेश मिनमिणे, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, उपसरपंच निलेश तांबटकर, शिवसेनेचे युवा नेते दीपेश वरणकर, तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, कार्यकर्ते चंद्रकांत झोरे, तेलवडे सरपंच कल्पना पवार, रवी वाघमारे, राजेश वाघमारे, रूपाली वाघमारे, अविनाश शिंदे व आदिवासी बांधव उपस्थित होते.

या वेळी विघ्नेश माळी यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी यांनी सर्वात मोठा निधी मुरूड तालुक्याला देऊन मोठा विकास साधला आहे. तेलवडे टक्का आदिवासीवाडीमधील ३४ घरकुले मंजूर केली आहेत. ज्याप्रमाणे आता १२ लोकांना घराच्या चाव्या दिल्या आहेत त्याप्रमाणे उर्वरित लोकांनासुद्धा चाव्या देण्यात येणार आहेत. मुरूड तालुका संघटक दिनेश मिनमिणे यांनी, आमदार महेंद्र दळवी यांनी टक्का आदिवासीवाडी रस्त्यासाठी ५० लाखांचा निधी मंजूर केला असून हे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती दिली.



## कर्जतमधील ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**कर्जत : प्रतिनिधी**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आगामी विधानसभा निवडणुकीत या प्रवेशाचा लाभ शिवसेनेच्या उमेदवाराला होईल, असे चित्र निर्माण होत आहे.

कर्जतच्या शिवसेना बाळासाहेब भवन जनसंपर्क कार्यालयात प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संपर्कप्रमुख विजय पाटील, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप, खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, प्रसाद थोरवे, अभिषेक सुर्वे, रोहित विचारे आदी पदाधिकारी उपस्थित होते. आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत वडवळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र विष्णू सकपाळ, युवा सेना अधिकारी उबाठा गट संतोष सकपाळ, उपतालुकाप्रमुख अशोक मरागजे यांच्या नेतृत्वाखाली शंकर शिंदे, पांडुरंग शिंदे, प्रकाश सपकाळ, सुनील सकपाळ, संकेत जाधव, नामदेव सकपाळ, दिनेश सकपाळ, संतोष सकपाळ, केशव सकपाळ, विजय सकपाळ, बजरंग मरागजे, रवींद्र मरागजे, लोकेश सकपाळ, प्रसाद शिंदे, वैष्णव सावंत, सुनील सावंत, विपुल सकपाळ, आनंद सकपाळ तसेच खोपोली येथील उमेश गायकवाड, प्रमोद भांबळे, सचिन केदार, प्रसाद पंडित यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

आमदार थोरवे यांनी, शिवसेनेमध्ये आपल्या सर्वांचे स्वागत आहे. जी व्यक्ती चांगले काम करते तिला नेहमीच पक्षात मानसन्मान दिला जातो. कोयना प्रकल्पात असणाऱ्या २२ गावांचा योग्य तो विकास केला जाईल व त्या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आपल्याला योग्य त्या सेवा सुविधा दिल्या जातील, असा शब्द दिला.

## राष्ट्रपतीपदक प्राप्त उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे खालापूरकरांच्या सत्काराने भारावले

**चौक : प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन भूमीत सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे एका शेतकऱ्याच्या मुलाला राष्ट्रपती पदकापर्यंत पोहचता आले, असे उद्‌गार राष्ट्रपती पदक विजेते पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे यांनी काढले.

खालापूर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस उपनिरीक्षक शिवाजी गोविंद जुंदरे यांना राष्ट्रपती पदक मिळाले आहे. खालापूर ग्रामस्थांच्या वतीने जुंदरे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी जुंदरे बोलत होते. श्रीकांत कोकणी जुंदरे यांच्या राष्ट्रपती पदकापर्यंतचा प्रवास उलगडला. अट्टल गुन्हेगारांना जेरबंद करण्याची कामगिरी पोलीस उपनिरीक्षक जुन्नर यांनी केल्याचे ऐकून उपस्थित अवाक झाले. खालापूर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र शहा, उद्योजक महेश राठी, पुंडलिक लोते, इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्ष क्षमा आठवले, लक्ष्मण जाधव, उमेश पडवकर साहिल सावंत, योगेश जाधव, शिक्षक श्रीकांत कोकणी यांच्या उपस्थितीत जुंदरे यांचा गौरव करण्यात आला. जुंदरे यांनी त्यांचा जीवन प्रवास सांगितला. १९९०मध्ये नाशिक जिल्ह्यातील पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. २०२३मध्ये खात्यांतर्गत परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती झाल्याचे सांगितले. रायगडमधील माणसे अतिशय प्रेमळ असून सत्काराच्या निमित्ताने प्रचिती आली, असे जुंदरे यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनामुळे राष्ट्रपती पदकाचा बहुमान प्राप्त झाला, असे जुंदरे यांनी सांगितले.

## अविनाश दांडेकर यांचा शिवसेनेत प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे चेरमन अविनाश दांडेकर यांनी नुकताच शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी यांनी त्यांचे स्वागत केले.

एक अनुभवी नगरसेवक व सहकार क्षेत्रात अनुभव असणारा व्यक्ती शिवसेनेत प्रवेश केल्याने नक्कीच पक्षाची ताकद वाढणार असल्याचे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

या वेळी शिवसेनेचे शहर प्रमुख संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, योगेश ठाकूर, वीरेंद्र भगत मान्यवर उपस्थित होते. अविनाश दांडेकर हे मुरूड नगर परिषदेचे २५ वर्षे नगरसेवक म्हणून कार्य बजवाले आहे. मागील २६ वर्षे सुपारी संघावर संचालक म्हणून कार्य बजावत आहेत.



## खोपोली बाजारपेठेत सण उत्सवात खरेदीची लगबग

**खोपोली : प्रतिनिधी**



रक्षाबंधनानंतर कृष्ण जन्मोत्सव, दहीहंडी व गोपाळकाला त्यानंतर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारातील चलपेहल वाढली आहे. रक्षाबंधनासाठी राखी खरेदीसह भेटवस्तूंनी दुकाने नटली आहेत. आकर्षक गणपती मूर्तींनी कलाकेंद्रे, गणपती कारखाने व त्या संबंधित साहित्य विक्री दुकाने सजली आहेत.

शोभेच्या वस्तू, कपडे, पूजेच्या साहित्याने बाजारपेठेत झगमगाट आला असून शासनाच्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या खात्यात दोन महिन्यांचे तीन हजार रुपये जमा होत असल्याने अनोखा उत्साह दिसत आहे. बाजारात खरेदीसाठी नागरिकांचा उत्साहही वाढला असल्याने उत्सवांच्या दिवसांत बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खोपोली व खालापुरात अनेक ठिकाणी गणपती मूर्ती कारखाने व कलाकेंद्रात शेवटची कलाकुसर व अंतिम रूप दिले जात आहे. नागरिकांकडूनही आपल्या पसंतीची मूर्ती आगाऊ बुकिंग करण्याकरिता लगबग सुरू आहे. कपडे, सजावट, लायटिंगच्या दुकानात ही मोठ्या प्रमाणावर आधुनिक साहित्य भरण्यात आले असून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानातही तेवढीच सजावट करून वेगवेगळ्या पद्धतीने आकर्षक सूट ही देण्यात येत आहे.

मागील वर्षीच्या तुलनेत गणपती मूर्तीपासून ते अन्य सर्वच वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत, मात्र ग्राहक व व्यापारी दोघांचाही उत्साह मात्र कायम आहे.

## अलिबागमध्ये ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान

**अलिबाग** : अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन ही संस्था ज्येष्ठ छायाचित्रकारांचे योगदान लक्षात घेऊन दरवर्षी त्यांचा सन्मान करीत असते. यावर्षीही छायाचित्रदिनानिमित्त सदानंद पाटील (वाघ्रण), सुरेश खडपे (चौल), रवींद्र घरत (चौल) या ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, अतुल वर्तक, विजय पाटील, अमर मढवी, योगेश सावंत, मच्छिंद्र दवंडे, गणेश जाधव, निलेश दुदम, रविराज पाटील, विराज घरत हे उपस्थित होते.

## शिवसेनेच्या मंगळागौर स्पर्धेत संत शिरोमणी नामदेव शिंपी समाज महिला मंडळ प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेततर्फे भव्य दिव्य मंगळागौरी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत तालुक्यातील १२ संघ सहभागी झाले होते. मुरूड भंडारी बोर्डिंग येथे आयोजित केलेल्या भव्य मंगळागौर नृत्य स्पर्धेत संत नामदेव शिंपी समाजाच्या महिला मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना २० हजार रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. हे बक्षीस शिवानी नाझरे, रोशनी सदरे व राजश्री सदरे यांनी बक्षीस स्वीकारले.

द्वितीय पारितोषिक ब्रह्मन् समाज महिला सखी ग्रुप यांना १५ हजार रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. हे बक्षीस तनुजा गोबरे, स्नेहा गद्रे, समिधा उपाध्ये, अस्मिता पेंडसे, शुभांगी जोशी, सुषमा जोशी, कांचन जोशी, जयश्री जोशी, सानिका देवगणे आदींनी स्वीकारले. तृतीय बक्षीस रायगडची हिरकणी नांदगाव यांना १० हजार रोख देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना मृदंगची साथ ऋषिकेश बेडेकर यांनी दिली. उत्तेजनार्थ घे भरारी नांदगाव मंडळ यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमासाठी आमदार महेंद्र दळवी, माजी जि. प. सदस्य मानसी दळवी, शिवसेना जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, जिल्हाप्रमुख संजीवनी नाईक, जिल्हा संपर्क प्रमुख निर्मला म्हात्रे, तालुका प्रमुख वैशाली रोटकर, उपतालुका प्रमुख मंदा ठाकूर, तालुका संपर्क प्रमुख स्नेहा पाटील, मेघाली पाटील, युगा ठाकूर, शहर प्रमुख संगीता परकर, उपशहर प्रमुख पूनम महाडिक, राजपुरी जिल्हा संपर्क प्रमुख जिविता मिनमिने, स्वाती मयेकर, विनाया पाटील, दिप्ती खेऊर, शाहिस्ता शेख, मानसी भोसले, सुधा खेऊर, सानवी चौलकर, प्रतिभा गायकर आदी उपस्थित होते.




# प्रो गोविंदा लीगमध्ये सातारा सिंघम्सला विजेतेपदाचा मान

**मुंबई : प्रतिनिधी**

गतविजेत्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) संघाने प्रो गोविंदा लीग सीझन २च्या अंतिम फेरीत कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) संघाला पराभूत करीत विजेतेपदासह २५ लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले.

मुंबईतील डोम, एसव्हीपी स्टेडियमवर बहुप्रतीक्षित प्रो गोविंदा लीग सीझन २च्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) आणि कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) यांच्यामधील अंतिम फेरी विलक्षण रंगतदार झाली. अखेर गतविजेत्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) संघाने विजय मिळविला. कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) संघाला उपविजेते म्हणून १५ लाख रुपयांचे बक्षीस मिळाले.



आमदार प्रताप सरनाईक, प्रो गोविंदा लीगचे संस्थापक व अध्यक्ष, प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पूर्वेश सरनाईक, प्रो गोविंदा लीगचे संचालक मजहर नाडियादवाला, प्रो गोविंदा लीगचे संचालक मोहम्मद मोरानी आणि विहंग सरनाईक या वेळी उपस्थित होते. चार गटांमध्ये १६ मातब्बर संघ सहभागी झाले होते. पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत, ठाणे टायगर्स (आर्यन्स गोविंदा) यांचा सामना कोल्हापूर किंग्ज (बालवीर गोविंदा) यांच्याशी अत्यंत चुरशीच्या लढतीत खेळला गेला. दुसऱ्या सामन्यात लातूर लिजेंड्स (यश गोविंदा) यांचा कोकण जायंट्स (कोकण नगर गोविंदा) विरुद्ध सामना होता. लातूर संघाने विजयश्री संपादन केली. सातारा सिंघम (जय जवान गोविंदा) मध्य मुंबई (ओम ब्रह्मांड साई गोविंदा) यांच्याशी भिडल्याने उत्साह कायम राहिला. पहिल्या उपांत्य फेरीत कोल्हापूर किंग्ज (बालवीर गोविंदा) आणि लातूर लिजेंड्स (यश गोविंदा) यांच्यात सामना झाला. अपवादात्मक सांघिक कार्य आणि रणनीतीसह, किंग्जने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. दुसऱ्या उपांत्य फेरीत, सातारा सिंघम (जय जवान गोविंदा) अलिबाग नाईट्स (श्री अग्रेश्वर गोविंदा) विरुद्ध आमनेसामने गेले. मजबूत रचना आणि सामरिक पराक्रमासाठी ओळखले जाणाऱ्या कौशल्याच्या जोरावर सातारा सिंघम विजयी झाले आणि त्यांनी एका रोमांचक अंतिम लढतीसाठी स्थान निश्चित केले. लातूर लिजेंड्स (यश गोविंदा) आणि अलिबाग नाईट्स (श्री अग्रेश्वर गोविंदा) यांनी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकासाठी ठेवलेले दहा लाख व पाच लाख रुपयांचे बक्षीस पटकावले.

लीगच्या अंतिम फेरीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आणि राज्यसभेचे खासदार मिलिंद देवरा आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# विनेश फोगटला मिळणार 'गोल्ड मेडल'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत कुस्तीगीर विनेश फोगटने दमदार कामगिरी केली होती. क्यूबाच्या युस्नेलिस गुझमान लोपेझचा तिने ५-० गुणांनी पराभव केला होता. विनेशच्या या कामगिरीने भारताचे स्पर्धेतील चौथे पदक निश्चित झाले होते, मात्र फायनलच्या दिवशी विनेशचे वजन काही ग्रॅम्सने जास्त भरल्याने तिला अपात्र घोषित करण्यात आले. विनेशने या निर्णयाविरोधात कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट्सकडे दाद मागितली होती, परंतु त्यातही निराशाच पदरी पडली. आता मात्र विनेशला थेट 'गोल्ड मेडल' मिळणार आहे.

रौप्यपदक न मिळाल्याचे दु:ख तिने व्यक्त केले होते. भारतीयांची मान उंचावणाऱ्या विनेशला दु:खी पाहून हरयाणाच्या खाप पंचायतने तिला सुवर्णपदक देण्याचे आश्वासन दिले आहे. रविवारी खाप पंचायतींनी घोषित केले की, ते विनेशला सुवर्णपदक देऊन सन्मानित करतील. हे पदक ऑलिम्पिकमधील विजेत्यांना प्रदान केलेल्या सुवर्णपदकाच्या बरोबरीचे असेल, असेही ते म्हणाले.

सांगवान खापचे अध्यक्ष आणि अपक्ष आमदार सोंबीर सांगवान आणि इतर खाप नेत्यांनी रविवारी बलाली या विनेशच्या मूळ गावी तिची भेट घेतली. त्याचप्रमाणे २५ ऑगस्ट रोजी रोहतकमध्ये तिच्या सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमासाठी त्यांनी तिला आमंत्रित केले आहे. या कार्यक्रमात हरयाणा आणि इतर उत्तरेकडील राज्यांतील खाप सहभागी होणार असल्याची माहिती सांगवान यांनी दिली. ऑलिम्पिकमध्ये विजेत्यांना दिल्या जाणाऱ्या सुवर्णपदकाप्रमाणेच आम्ही सुवर्णपदक बनवू. त्याचे वजन ५० ग्रॅम किंवा १०० ग्रॅम असू शकते, असे सांगवान म्हणाले.

# टीम इंडियाकडून कांगारुंचा १७१ धावांनी धुव्वा

## ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा विजयी शेवट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वूमन्स टीम इंडिया 'ए'ने ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा शेवट विजयाने केला आहे. टीम इंडियाने तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाला १७१ धावांच्या फरकाने धुव्वा उडवला आहे. टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २४४ धावांचे आव्हान दिले होते, मात्र टीम इंडियाच्या गोलंदाजांसमोर कांगारुंनी गुडघे टेकले. कांगारु २२.१ ओव्हरमध्ये ७२ धावांवर ऑलआऊट झाले. टीम इंडियासाठी प्रिया मिश्रा हीने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. तर ऑस्ट्रेलियाकडून फक्त तिघींनाच दुहेरी आकडा गाठता आला. ऑस्ट्रेलियाने या पराभवानंतर ३ सामन्यांची मालिका ही २-१ अशा फरकाने जिंकली.

ऑस्ट्रेलियाकडून मॅडी डार्क, टेस फ्लिंटॉफ आणि चार्ली नॉट या तिघींनी सर्वाधिक धावा केल्या. मॅडी डार्क हिने सर्वाधिक २२ धावांचं योगदान दिले. टेस फ्लिंटॉफ हीने २० धावा केल्या. तर चार्ली नॉट हीने ११ रन्स जोडल्या. ऑस्ट्रेलियाच्या दोघींना भोपळाही फोडता आला नाही, तर ५ जणींना दुहेरी आकड्याआधीच मैदानाबाहेरचा रस्ता धरला. टीम इंडियाकडून प्रिया मिश्रा हीच्याव्यतिरिक्त कॅप्टन मिन्नू मणी हीने २ विकेट्स घेतल्या. मेघना सिंह आणि, सोप्पधंडी यशश्री आणि साईका ईशाक या तिघींनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

दरम्यान त्याआधी ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून टीम इंडियाला बॅटिंगसाठी भाग पाडलं. टीम इंडियाने ५० ओव्हरमध्ये ९ विकेट्स गमावून २४३ धावांपर्यंत मजल मारली.

१९ वर्षांखालील महिला विश्वचषक स्पर्धा

# भारतीय संघ वेस्ट इंडिज संघाविरूद्ध देणार सलामी

**दुबई : वृत्तसंस्था**

पुढील वर्षी १८ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत मलेशिया येथे पार पडणाऱ्या महिलांच्या १९ वर्षांखालील विश्वचषकात गतविजेत्या भारताला सलामीला वेस्ट इंडिजविरूद्ध दोन हात करावे लागतील. अ गटात भारताला यजमान मलेशिया, वेस्ट इंडिज आणि श्रीलंकेसोबत स्थान मिळाले आहे.

गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत अंतिम सामन्यात इंग्लंडला पराभूत करत भारतीय महिलांनी १९ वर्षांखालील विश्वचषकावर नाव कोरले होते. प्रत्येक गटातील संघ राऊंड रॉबिन पद्धतीने सामने खेळणार आहे. त्यामुळे गटफेरीत प्रत्येक संघाला प्रत्येकी तीन सामने खेळण्याची संधी आहे. चारही गटांतील अव्वल तीन संघ सुपर सिक्स फेरीसाठी पात्र ठरतील.

सुपर सिक्स फेरीसाठी १२ संघांना दोन गटांत विभाजित करण्यात येईल. या दोन्ही गटांमधील अव्वल दोन संघ ३१ जानेवारीला उपांत्य सामना खेळतील. ३ फेब्रुवारीला विश्वचषकाचा अंतिम सामना पार पडेल. उपांत्य आणि अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आले आहे.

# इंडियन स्ट्रीट प्रीमिअर लीगचा दुसरा हंगाम ठाण्यात रंगणार थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन स्ट्रीट प्रीमिअर लीग आपल्या दुसऱ्या हंगामाकडे कूच करीत आहे. २६ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दुसऱ्या हंगामाचा थरार रंगेल. ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये या पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील विविध ५५ शहरांमध्ये खेळाडूंच्या चाचण्या होणार आहेत.

भारतातील पहिली-वहिली टेनिस बॉल टी-१० क्रिकेट स्पर्धा देशभरातील इच्छुक क्रिकेटपटूंना एक नवे व्यासपीठ देत आहे. ज्यांना या स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे ते शिलेदार पाच स्पर्धात्मक झोनमध्ये विभागलेल्या ५५ शहरांमध्ये चाचण्यांसाठी नोंदणी करू शकतात.

५५ पैकी प्रत्येक शहरात झालेल्या चाचणी प्रक्रियेत सर्वोत्तम कामगिरी करणारे विभाग स्तरावर जातील. विभागीय पातळीवर सर्वोत्तम कामगिरी करणारे अव्वल खेळाडू लिलाव पूलमध्ये पोहचतील. प्रत्येक झोनसाठी अंतिम चाचण्यांसाठी विशिष्ट तारखा आहेत. मध्य आणि दक्षिण विभाग २६ ते २८ ऑक्टोबर, पूर्व आणि उत्तर विभाग २ ते ४ नोव्हेंबर आणि पश्चिम विभाग ५ ते ९ नोव्हेंबर या काळात चाचण्या होणार आहेत. १२ आणि १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सिम्युलेशन सामने होतील. अर्थात खेळाडूंना याद्वारे आपली क्षमता दाखवण्याची संधी मिळेल.

भारतीय क्रिकेटचा चेहरा, भारतरत्न सचिन तेंडुलकर ISPLच्या कोअर कमिटीचा सदस्य आहे. माध्यमांशी बोलताना सचिनने सांगितले की, ज्या खेळाडूंना त्यांची प्रतिभा दाखवण्याची संधी मिळाली नसेल त्यांना ISPL हे एक व्यासपीठ आहे. या स्पर्धेने नवीन प्रेक्षकांसाठी खेळाचा आनंद आणला आहे आणि देशभरातील युवा क्रिकेटपटूंसाठी दरवाजे उघडले आहेत. स्वत:ला सिद्ध करण्यासाठी ही एक संधी आहे असे समजा. मला आशा आहे की लीग सतत वाढत आहे आणि भारतीय क्रिकेटवर कायमस्वरूपी प्रभाव पाडत राहील, ज्यामुळे प्रत्येक खेळाडूला मोठे स्वप्न पाहण्याची संधी मिळेल.



**पनवेल : रक्षाबंधण सण उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, श्रीधर ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, नारायण ठाकूर, पांडुरंग ठाकूर, परेश ठाकूर, अविनाश ठाकूर, सुहास ठाकूर यांना अनुसया वास्कर, राधाताई ठाकूर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, तुलसाबाई घरत, सीताबाई भोईर, ठकुबाई म्हात्रे, प्रमीला वास्कर, बयोबाई ठाकूर यांनी राखी बांधून भाऊ-बहिणींच्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. या वेळी कल्पना ठाकूर, सारीका पाटील, जागृती भोईर, छाया ठाकूर, रजनी भरत ठाकूर, सुनीता ठाकूर, रजनी पंढरीनाथ ठाकूर उपस्थित होत्या.**













# आरसीबीकडून रक्षाबंधनाच्या अनोख्या शुभेच्छा

**मुंबई** : देशभरात मोठ्या उत्साहात रक्षाबंधनाचा सण साजरा केला जात आहे. आयपीएलमधील आरसीबीने रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देताना एक लक्षवेधी पोस्ट केली.

विराट कोहली आणि महिला संघाची खेळाडू श्रेयांका पाटील यांचा फोटो शेअर करीत त्यांनी भारी कॅप्शन लिहिले. विराट आता केवळ वन डे, कसोटी आणि आयपीएलमध्ये खेळताना दिसेल. आरसीबीने विराट आणि श्रेयांका यांचा फोटो शेअर करत म्हटले की, जसे आमचे सुपरस्टार त्यांच्या बॅटचे रक्षण करतात तसे तुमच्या बहिणींचे रक्षण करा. विराट पावसात बॅट भिजू नये म्हणून तिची काळजी घेताना दिसत आहे.



# सानपाड्यात रंगली नारळ फोडणे स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवसेना सानपाडा विभाग आयोजित नारळी पौर्णिमेनिमित्त नारळ फोडणे स्पर्धेत हनुमंत जाधव हे २४ नारळ फोडून प्रथम क्रमांकाचे तसेच भिवाजी हांडे हे २३ नारळ फोडून द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले, तसेच तिसरे मानकरी नानासाहेब गायकवाड नऊ नारळ फोडून ठरले.

महिलांमध्ये मीनल शिंदे यांनी आठ नारळ फोडून महिलांमध्ये पहिला प्रथम क्रमांक पटकाविला. स्पर्धेत शिवसेना उपनेते विजय नाहटा, उपशहर प्रमुख सूर्यकांत झेंडे, विभाग प्रमुख संजय वास्कर, उपविभाग प्रमुख मनोज भोईर, गुरुनाथ पाटील, शाखाप्रमुख उमेश लोहोट, साहिल भोईर, समीर भोईर, ओमी राणा, शाखा संघटक मेघा पवार, उपशहर संघटक सुजाता पाटील, शहर संघटक सुरेखा गव्हाणे, महिला विभाग संघटक नंदा येवले आदी उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com